# कृषितीर्थ

डिसेंबर २०१९ • वर्ष २ • अंक १ • जळगाव • पृष्ठे ५२ • मूल्य १० रु





''स्वत:बद्दल आत्मविश्वास ठेवा, तो चेहऱ्यावर प्रज्वलित होऊ द्या, त्याला अविरत कष्टाची आणि चिकाटीची जोड द्या. यश नक्कीच प्राप्त होईल.''

– भवरलाल जैन

# अर्जुना समत्व चित्ताचें। तेंचि सार जाणें योगाचें। जेथ मन आणि बुद्धीचें। ऐक्य आथी।।



**अशोक जैन**
अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.

## अध्यक्षीय

**गेल्या एक वर्षांपासून आपली कंपनी अनंत अडचणींचा सामना करते आहे. याही कठिण परिस्थितीत आपण आपले आस्तित्व टिकवून ठेवत संकटांवर मात करण्याचा प्रयत्न करीत आहोत. या प्रयत्नांच्या पाठिमागे मोठ्या भाऊंच्या अभेद्य विचारांचे संरक्षक कवच व आधार आपल्यासोबत आहे. भाऊंच्या विचारांचा आधार ही जगण्याची पृष्ठभूमी आहे. वाटचालीला चैतन्याचा गाभा तेवत ठेवणे म्हणजे आधार. पांगुळगाडा आधारात नसतो. अंधारात मदतीचा हातही अपेक्षित नाही. यातले सहाय्य हे निमित्त असते; परंतु ज्याच्या जीवनाची धार आसमंत होऊन कर्तृत्वाची घराणी निर्माण करते, तो खरा आधार असतो. माणसाला नेहमीच कुणाचा ना कुणाचा आधार लागतो. आधार नसला तर तो निराधार होतो. निराधार हाही एक प्रकारचा आधार असतो. भाऊंनी चोखाळलेली वाट आपल्यासाठी निश्चितच दिशादर्शक आहे. सूर्योन्मुखी राजस व्यक्तिमत्व असलेल्या भाऊंच्या ८२व्या जन्मदिनानिमित्त या संकटातून आपण निश्चितच बाहेर येऊ या संकल्पाचा पुनरूच्चार करू या आणि त्यासाठी एकजुटीने, एकदिलाने खांद्याला खांदा लावून भाऊंनी दिलेल्या कार्यसंस्कृतीचा वसा आणि वारसा पुढे नेऊ या. मोठ्या भाऊंच्या जन्मदिनाच्या याच शुभकामना!**

आयुष्यात प्रत्येक माणसाला संकटांचा सामना करावा लागतो. फक्त ती प्रत्येकाच्या आयुष्यात निरनिराळी रूपे घेऊन येतात. या संकटांशी दोन हात करण्याचे सामर्थ्य परमेश्वराने प्रत्येकाला दिलेले आहे. तो त्याचा कसा वापर करतो हे बुद्धी आणि चित्ताचे समत्व कसे आहे यावर अवलंबून असते. आमचे परमपूज्य पिताजी भवरलाल जैन म्हणजे मोठे भाऊ यांनी आयुष्यभर अनेक संकटांचा सामना केला. शारीरीक, मानसिक, औद्योगिक, कौटुंबिक सामाजिक, आर्थिक, राजकीय अशी सर्व प्रकारची संकटे त्यांनी पाहिली, अनुभवली, सोसली आणि त्यांच्यावर समर्थपणे मातही केली. भाऊ नेहमी म्हणायचे–

''जेव्हा–जेव्हा आपल्याला वाटते की, समोर येणारे आव्हान, अडचणी आपल्या आवाक्याच्या बाहेर आहेत, तेव्हा एकच गुरूमंत्र गिरवा. आपल्या स्वतःचे परिश्रम दुप्पट करा. एखाद्या नावीन्यपूर्ण मार्गाच्या शोधात राहा. प्रामाणिकपणे व अधिक पारदर्शकतेने ज्यांच्याकडून मदत पाहिजे त्यांना सर्व सांगा. तुमच्या उद्दिष्टांना निश्चित सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

एक खुणगाठ बांधा, ज्या ज्या वेळी आव्हाने येतात ती एकटी–दुकटी येत नाहीत. खरेतर दोन–चारच्या जोडीनेही येत नाहीत. आव्हाने आणि अडचणी येतात, हजारोंच्या झुंडीने आणि धडका मारतच राहतात.

(अशावेळी) आपल्यासमोर दोन मार्ग असतात. पैकी एक जवळचा व सोपा वाटणारा आणि दुसरा मात्र कठीण; पण लांबच्या पल्ल्याचा. अशा वेळी दीर्घकालीन पर्यायाचा स्वीकार करा. कारण, त्यातून कायमस्वरूपी समाधानकारक परिणाम हाती लागण्याची शक्यता निश्चितच अधिक असते''.

भाऊंचे हे विचार राष्ट्र जीवनात परिवर्तन करण्याची ठोस इच्छा बाळगणाऱ्या प्रत्येकाला निश्चितपणे मार्गदर्शक ठरतील याविषयी माझ्या मनात शंका नाही. भाऊंच्या चित्ताचे समत्व पाहिल्यानंतर संत ज्ञानदेवांनी लिहिलेली पुढील ओवी आठवते–

**अर्जुना समत्व चित्ताचें। तेंचि सार जाणें योगाचें।**
**जेथ मन आणि बुद्धीचें। ऐक्य आथी।।**

याचा अर्थ– अर्जुना, मनाचा समतोल राखण्याची हातोटी, तेच योगाचे सार आहे. त्या स्थितीत मन आणि बुद्धीचे ऐक्य असते. आमच्या भाऊंनी मानवी मनाचा आणि बुद्धीचा सखोल विचार केला होता. निष्काम कर्मयोगाने आपण आपले काम करीत राहावे. काम यशस्वी झाले तर ठिक आणि अयशस्वी झाले तरी ठिक. मनाला लावून घेण्याचे कारण नाही. मनाने मनाचा अभ्यास करताना भाऊंनी एक महत्वाचे सूत्र सांगितले, ते म्हणजे, मनापासून आपण काम केले पाहिजे. काम संपले तरीही मनाचा समतोल टिकला पाहिजे. मुळात काम कधीही संपत नसते. मानले तर, कामाला अनेक परिमाणे असतात. कामातून नवीन–नवीन कल्पना सुचतात. सुचणे हा मनाचा स्वभाव आहे. चांगले सुचण्यासाठी मन तयार ठेवले पाहिजे. मनाला भरकटू देता कामा नये. एकदा का मन सैरभैर झाले की, माणसाचा पूर्ण तोल जातो. त्याला काहीही सुचत नाही. तो गोंधळात गोंधळ घालतो. त्यातून त्याची चिडचिड सुरू होते. त्यामुळे व्यक्तिमत्वाचा मूळ उद्देश हरवतो. मूळ उद्देश कोणता! माझ्या व्यक्तिमत्वातून जिज्ञासा आणि अभ्यास व्यवस्थित झाला पाहिजे. कोणत्याही विषयाचे अध्ययन मी रस घेऊन केले पाहिजे. मनापासून केलेला अभ्यास चांगल्या कामाला प्रवृत्त करतो. विषयाच्या मुळापर्यंत जाण्यासाठी आपण मनाला बजाविले पाहिजे. मन आणि मी यात मित्रत्वाचे नाते असले पाहिजे. मनाची समजूत काढता आली पाहिजे. मनाशी संवाद करता आला पाहिजे. हे जो उत्तमपणे करून समोरच्याचा पूर्ण विश्वास संपादन करू शकतो त्याला संकटांचे कधीही भय वाटत नाही.

# "विज्ञानाने बुद्धी विशाल व धारदार तर अध्यात्माने हृदय व आत्माही सुसंस्कारित."



डॉ. सुधीर भोंगळे
संपादक

## संपादकीय

१२ डिसेंबर. भाऊंचा जन्मदिवस. या वर्षात मी काय चांगले नि काय वाईट केले याच्या चिंतनशील जमाखर्चाचा दिवस म्हणजे वाढदिवस. शरीराने आज भाऊ आपल्यात नाहीत. परंतु त्यांनी आपल्या ७९ वर्षाच्या आयुष्यात जे 'न भूतो न भविष्यती' अशा प्रकारचे दैदीप्यमान काम उभे करून ठेवले आहे त्यामुळे ते रोज मनाने, विचाराने आपल्यातच असतात. निसर्ग आणि आत्मचिंतन यांच्या मेळातून त्यांना आत्मस्वर गवसला होता. या आत्मस्वराचा पाया व बैठक ही घरच्या सुसंस्कारांमुळे अध्यात्म व विज्ञानाची होती. प्रत्येक गोष्ट विचार व मननाच्या कसोटीवर आणि शास्त्राच्या निकषावर तपासून मगच पुढची पाऊले ते टाकत राहिले. पण प्रत्येक पाऊल टाकताना राष्ट्राचे आणि समाजाचे कल्याण व शेतकऱ्यांची आर्थिक व सर्वांगीण उन्नती हाच भाऊंचा निदिध्यास होता. एका मानवी जन्मात, कोणतीही प्रदीर्घ परंपरा व वारसा फारसा पाठिशी उभा नसताना एवढे मोठे मूलभूत कार्य करणे ही असंभव वाटणारी गोष्ट आहे. परंतु ती भाऊंनी मोठ्या मेहनतीने व विचारपूर्वक सत्यात उतरवून दाखविली. हे सगळे काम करताना त्यांच्या विचारांना अध्यात्म आणि विज्ञान याची जी बैठक लाभली त्याचा धावता आढावा ८२व्या जयंतीनिमित्त येथे घेतला आहे.



**"विज्ञानाने बुद्धी विशाल व धारदार होते तर अध्यात्माने हृदय व आत्माही सुसंस्कारित होतो."**


वरील विचार भवरलाल जैन यांनी २८ सप्टेंबर, २००८ रोजी जळगाव येथील नूतन मराठा महाविद्यालयाच्या सभागृहात भरलेल्या अंधश्रद्धा निर्मूलन परिषदेत व्यक्त केले होते. विज्ञान आणि अध्यात्म या विषयाची चर्चा जगभर आणि आपल्या देशातही शेकडो वर्षांपासून चालू आहे आणि पुढेही चालू राहील याविषयी निदान मला तरी शंका नाही. अध्यात्म आणि विज्ञान यांचा उत्कृष्ट मिलाफ भवरलालजींच्या जीवनात झाला होता. किंबहुना त्यांनी आयुष्यभर कृषी, पाणी, प्रक्रिया, सिंचन, सौर उर्जा, जलसंधारण व पाणलोट विकास, मृद संधारण, वनीकरण, फळबागा उभारणी, टिश्यूकल्चर, शेडनेट व ग्रीनहाऊसमध्ये उत्पादन, ठिबक संच, पाईप निर्मिती, एरोपोनिक्स, हायड्रोपोनिक्स, कांदा पेरणी यंत्रापासून शेतीकामात लागणारी विविध अवजारे, बायोगॅस, बायोएनर्जी अशा विविध क्षेत्रांमध्ये स्वत: नवनवीन प्रयोग व संशोधन करून जे दैदीप्यमान काम केले त्याचा संपूर्ण पाया व आधार विज्ञान आणि अध्यात्म हाच होता. **"भौतिक विकासाला अध्यात्माची जोड दिली नाही तर आपण वाहतच जाऊ,"** हे रोटरी क्लबच्या भाषणातील मोठ्या भाऊंचे वाक्य आजच्या तरूण पिढीने व ज्यांना काही मेहनतीने नवे उभे करायचे आहे त्यांनी आवर्जून विचार करावा असे आहे.

आज अध्यात्माच्या नावाखाली अनेक धंदे व गैरधंदेही चालू आहेत. अध्यात्माला बाजारू व धंदेवाईक स्वरूप प्राप्त झाले आहे. किर्तन, प्रवचने, भजने, कथासप्ताह यांच्या बिदागी लाखो रुपयांवर गेल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक्स वाहिन्यांवर अध्यात्माचा पूर येऊन ते ओसंडून वाहते आहे. मोठ्या भाऊंना हे असले धंदेवाईक अध्यात्म कधीच अभिप्रेत नव्हते. कोठारी ग्रुपच्या छापखान्याच्या उद्‌घाटन प्रसंगी **"ईश्वरवादीपेक्षा प्रयत्नवादी असणाऱ्या व्यक्तीच्याच गळ्यात ईश्वर यशाची माळ घालत असतो,"** असे जाहीरपणाने विधान करून मोठ्या भाऊंनी ईश्वराकडे जाण्याचा मानवासाठी कोणता मार्ग चांगला आहे याचे कळत-नकळत किंवा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष

मार्गदर्शन केले आहे. भाऊ हे थोर तत्वचिंतक होते. सच्चे अभ्यासक साधक होते. त्यामुळे समोर घडणाऱ्या अनेक गोष्टी पाहिल्या की त्यांची अस्वस्थता चिंतनशीलतेत परिणत होत असे. त्या विचारातून ते स्वत:ला वारंवार घासूनपुसून घेत असत. त्यामुळे त्यांचे विचार कायम ताजेतवाने, टवटवीत, काळाशी सुसंगत व काळाला अनुरूप आणि परिवर्तनशील व पुरोगामी होते. अध्यात्म आणि विज्ञान एकमेकांच्या विरोधी नाही. किंबहुना ते हातात हात घालूनच पुढे गेले पाहिजे याबद्दल भाऊ खूप आग्रही होते. त्याची मते व विचारांचा सविस्तर आढावा घेण्यापूर्वी आपण अगोदर थोडक्यात अध्यात्म आणि विज्ञान म्हणजे काय ते समजून घेण्याचा प्रयत्न करू.

अध्यात्म हा शब्द 'अधि' आणि 'आत्म' या दोन शब्दांपासून तयार झाला आहे. 'अधि' हा संस्कृतातला उपसर्ग आहे. त्याचा अर्थ तद्विषयक किंवा त्याविषयी असा आहे. याचा सरळ अर्थ म्हणजे आत्म्याविषयी ज्ञान. अध्यात्म म्हणजे आत्म्याविषयी संपूर्ण ज्ञान होणे. यात आत्मा आणि अनात्मा यांचा विवेक असतो. आत्मा हा शब्द 'अन्' धातूपासून निघाला आहे. अन् म्हणजे श्वासोच्छवास करणे. या प्रक्रियेत असणे. ऋग्वेदात आत्मा शब्दाचे तत्व, सार, शरीर, बुद्धी, नियंता, प्राण, आनंदमय, बल, जीव वगैरे विविध अर्थ दिले आहेत. उपनिषदांमध्ये आत्मा म्हणजे शरीरातील नित्य व आनंदमय तत्व असा अर्थ आढळतो. श्री. शंकराचार्यांनी 'आत्मा ही नाम स्वरुपम्' असे लिहिले आहे. याचा अर्थ आत्मा हा आपले किंवा वस्तुचे मूळ रुप होय असा आहे. आत्मा हा शरीराचा नियंता आहे.

**अध्यात्माच्या व्याख्येचे साधारणपणे दोन भाग होतात. पहिल्या भागात इंद्रियांना येणारा व दुसऱ्या भागात इंद्रियांच्या पलीकडे असलेला अनुभव अशी विभागणी करता येते.** पहिल्या भागात विज्ञान येते. विज्ञानाच्या विविध शाखा अंगे येतात. त्या सर्व प्रगत असून त्यांचे संशोधन पातळीवर अध्ययन, अध्यापन होत आहे. यात निरनिराळ्या शास्त्रांनी ज्ञानांचे एकत्रीकरण केले आहे. उदा. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, मानसविज्ञान, समाजभाषा विज्ञान, जैव तंत्रज्ञान वगैरे. यातले प्रत्येक शास्त्र विश्वाच्या एका भागाचे सूक्ष्म ज्ञान मिळविते. त्यातले वैज्ञानिक सत्य शोधून काढते. त्यातले निष्कर्ष अभ्यासक व संशोधकांना पुढच्या वाटचालीसाठी आधार ठरतात. पण हे सत्य मर्यादित असते. ते वैश्विक नसते. शिवाय कित्येकदा एका शास्त्रातील सत्य दुसऱ्या शास्त्रातील सत्याला पूरक ठरतेच असे नाही. अशा वेळी सर्व सत्यांचे चिंतनशील परीक्षण करून त्यांच्यातला विरोध नाहीसा करून त्यांच्या संकलनातून संबंध वैश्विक सत्य शोधून काढण्याचे कार्य 'दर्शन' करते. विज्ञान अपूर्णतेतून पूर्णाच्या शोधात सतत असते, आणि ते अपूर्ण राहते. दर्शन हे पूर्ण आणि व्यापक ज्ञान असते. अनंत विश्वाचा शोध घ्यायला मानवी आयुष्य केव्हाही अपुरे पडते. मानवी जीवनाची


भवरलालजींचे जीवनही पाण्यासारखे स्वच्छ शुभ्र व प्रवाही होते.

काही क्षेत्रे विज्ञानाच्या कक्षेबाहेर येतात. उदा. धर्म, नीती, कला, आत्मानुभव, मूल्ये इत्यादी यांचे सत्य विज्ञान कसे शोधणार?

विज्ञानातील विविध शारवांत काही गोष्टी सत्य म्हणून गृहीत धरलेल्या असतात. त्या सत्य मानल्यावाचून विज्ञानास आरंभ होत नाही. उदा. दिक्, काळ, कार्यकारणभाव, द्रव्य, गुण इत्यादी याचा अभ्यास विज्ञानात अधिक होतोय. मुळात विज्ञान केवळ इंद्रियानुभवांवर आधारित आहे. विज्ञानात सान्त वस्तूंचा अभ्यास प्रामुख्याने येतो. त्याची तार्किक चिकित्सा होते. सान्त म्हणजे ज्याला अंत आहे व जे चिरंतन नाही, नाश पावणारे आहे. विज्ञान अनुभवाला प्रमाण मानते. परंतु काही अनुभव इंद्रियांनी जरी घेतले तरी ते अतींद्रिय असतात. विज्ञान म्हणजे जाणीव. ही या विश्वाचा मूलाधार आहे. मन हे विश्वाचे मूळतत्व आहे. या विश्वाला निर्माण करणारे आणि त्याला गती देणारे असे एक जीवनतत्व आहे. त्याला चैतन्य म्हणतात. विश्वाला निर्माण करणारा अनादि, अनंत, सर्वस्पर्शी पूर्ण स्वस्वरूप विचार सातत्याने वैज्ञानिक व आध्यात्मिक अभ्यास करतो. त्यालाच हेगेल हा तत्वज्ञ 'ॲबसोल्यूट' असे म्हणतो. त्याच्यातून हे विश्व निर्माण होते. शोपेनहॉवर नावाचा जर्मन तत्वज्ञ वासना हेच विश्वाचे मूळ मानतो. तर व्हाईटहेड हा तत्वज्ञ भावना हे विश्वाचे मूळ रूप मानतो. ऋषी, मुनी, संत यांच्या मते विश्वाचे मूळ रूप अदृश्य व सूक्ष्म आहे हे खरे, पण इंद्रियांपेक्षा प्राण सूक्ष्म, प्राणापेक्षा मन सूक्ष्म, मनापेक्षा बुद्धी सूक्ष्म, बुद्धीपेक्षा आनंदकंद आत्मा अधिक सूक्ष्म असल्याने तो विश्वाचे आदिकारण आहे. आत्म्याच्या आनंदातून विश्व संभवते. आनंदाच्या आधारावरच ते जगते आणि आनंदाकडे वाहात राहते. याला 'अध्यात्मदर्शन' असे म्हणतात.

मोठ्या भाऊंनी आयुष्यभर शेतीलाच अध्यात्म मानले. तिच्या विकासासाठी विज्ञानाचा कसा व कोणकोणत्या पद्धतीने व रितीने वापर करता येईल याचा त्यांनी नुसता विचार केला नाही तर तद्नुषंगिक प्रयोगही 'चुका आणि शिका' या तत्वावरती करीत राहिले. स्वानुभव हाच आयुष्याचा सोबती आहे. तोच सर्जनशील नवनिर्माताही आहे. त्यातून जे उद्याला येणार आहे ते विकासाची व परिवर्तनाची नवी वाट दाखविणारे आहे यावर प्रगाढ श्रद्धा असल्यामुळे पहाटे पाच वाजता उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत नाविन्यपूर्ण कल्पनाशक्तीचा खेळ त्यांच्या अंतरंगात चालत असे. त्यातून शेतकऱ्यांसाठी निश्चित त्याला उपयोगी पडेल अशी काही तरी वस्तू, युक्ती, विचार किंवा कल्पना बाहेर पडत असे. त्यामुळे शेतकरीही आनंदी होत असे.

# विवेकानंदांच्या विचारांचा भाऊंवर प्रभाव



धर्म या संकल्पनेसंबंधी भवरलालजींनी जे विचार वेळोवेळी व्यक्त केले आहेत ते पाहता त्यांच्या विचारांवर स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा प्रभाव होता असे जाणवते. २००४ मध्ये धुळे येथे झालेल्या एका उद्योजकीय मेळाव्यात धर्म या विषयावर बोलताना भाऊ म्हणाले, '' **धर्म म्हणजे जीवन जगण्याची एक पद्धत. जीवन जगण्यासाठी लागणार असेल तर तो धर्म आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक असतो. समाज बांधणीत त्याचा निश्चित फायदा होईल.''** धर्मांनी सर्वसमावेशकवृत्ती धारण केली, तर जगाच्या विकासाला फार मोठा फायदा होऊन वेग येईल हे स्वामींनी आपल्या अनुभवातून तर भाऊंनी जगातील निरनिराळ्या देशात कारखाने उभे करून सिद्ध केले. सगळ्या धर्माच्या माणसांना भाऊंनी आपल्या कारखान्यात 'सहकारी' म्हणून घेतले. धर्म चिंतनातला संकुचितपणा आणि विशिष्ट सीमा या गोष्टी वगळल्या, तर धर्माला मानवी जीवनात उचित स्थान मिळते. धर्मांनी विशाल व उदार व्हावयास हवे. धार्मिक कल्पना सार्वजनिक झाल्या पाहिजेत, तरच धर्म पूर्णत: कार्यक्षम बनू शकेल. धर्म जोवर निवडक लोकांच्या हातात होता, तोवर तो अडकला. परंतु, धर्म जेव्हा आध्यात्मिक लोकांच्या हातात गेला तेव्हा तो सत्य आणि सजीव झाला. एक धर्म खरा ठरला, तर सर्व धर्म खरे ठरतात. एक धर्म खोटा ठरला, तर सगळे खोटे ठरतात. यासाठी निरनिराळ्या धर्मांमध्ये मैत्रीची भावना बळावली पाहिजे असे भाऊ नेहमी सांगत. बरेच जण धर्माचा उपयोग विचित्र पद्धतीने करतात. त्यातून मैत्री निर्माण होत नाही ही खंत भवरलालजींच्या मनात होती. त्यामुळ धर्म आणि आधुनिक विज्ञान यांच्यात मिलाफ घडवून धर्म आणि विचाराचा सूक्ष्म अभ्यास होणे आवश्यक आहे याबाबत ते आग्रही होते.



शेतातल्या कामाची आयुष्यभर पुरली अनुभवाची शिदोरी

शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद हा भाऊंच्या दृष्टीने सर्वोत्तम पुरस्कार होता आणि तेच श्रमाचे, पूजेचे फळही होते. विज्ञानाची कास धरून शांती व समाधान देणारे अध्यात्मिक फळ मिळविता येते हेच भाऊंनी कृतीतून सिद्ध केले. म्हणून **''कृषी हा एका अर्थाने वेगळ्या प्रकारचा उद्योग आहे. इथे केवळ आर्थिक नफ्याची संकल्पना नाही. ज्याला निर्मितीचा आनंद मिळवायचा आहे, त्यालाच या उद्योगात रमता येईल,''** असे जे विधान भाऊंनी केले आहे त्याला मोठा गर्भितार्थ व अध्यात्मिक बैठक आहे.

श्रवण, मनन आणि निदिध्यास या अध्यात्मातल्या तीन महत्वाच्या पायऱ्या आहेत. या तीनही पायऱ्यांचा अत्यंत बारकाईने अभ्यास करून भवरलालजींनी काटेकोरपणे त्या आपल्या जीवनात उतरविल्या होत्या. श्रवण म्हणजे केवळ ऐकणे नव्हे. चांगले ऐकण्याची सवय लावणे. साधारणपणे माणूस आपल्या सोयीचे असेल ते ऐकतो आणि गैरसोयीचे असेल ते सोडून देतो किंवा त्याकडे कानाडोळा तरी करतो. श्रवणात असे करून जमत नाही. सर्व इंद्रिये सातत्याने सावध ठेवावी लागतात. सोशिकता श्रवणातली आंतरिक सूक्ष्मता वाढविते. ऐकताना अनुभव होऊन जाण्यात श्रवणाचे खरे गुह्य असते. ते फार थोड्यांना जमते. आज कुणी कुणाचे फारसे ऐकत नाही. जो तो दुसऱ्याला ऐकविण्याच्या खटपटीत असतो. पण १९८९ पासून आपला मुकादम लक्ष्मण राठोड हा काय सांगतोय ते भाऊ बारकाईने ऐकत. काम करताना आलेले अनुभव, अडचणी समजून घेऊन त्यावरही कशी उपाययोजना करावी हे भाऊ लक्ष्मणला समजून सांगत. पहाटे पाच वाजल्यापासून सुरू होणाऱ्या या संवादाने जगाला आकर्षित करणारे व पाणलोट क्षेत्र विकासाचे अत्यंत शास्त्रशुद्ध व परिपूर्ण असे 'मॉडेल' उभे राहून ते अनेकांना 'रिज टू बॉटम' या तत्वावरती पाणलोट क्षेत्र विकासाचे काम कसे उत्कृष्टपणे करावे याचे मार्गदर्शन करीत आहे. मी परिपूर्ण सर्वज्ञानी व महाज्ञानी आहे असे भाऊंनी स्वत:ला कधीही मानले नाही. समोरच्याचे सर्व बोलणे शांतपणे ऐकून घेतल्यानंतर त्याच्या म्हणण्याचा जो सारांश तयार होत असे त्याला भाऊ आपल्या विचारांचे, अनुभवाचे व अभ्यासाचे अभ्यंग स्नान घालून धुवून पुसून स्वच्छ करीत आणि मग त्यावर स्वत:च्या विचारांचा लेप देवून विचारपूर्ण सुबकमूर्ती तयार करीत. हलक्या आवाजात प्रेमळ भावाने जे विचार भाऊ सांगत ते श्रवणाचा कान ज्याला आहे त्याला हे बरोबर ऐकू येत. असे हजारो श्रवण कान भाऊंनी तयार केले. ते त्यांचे मोठे कर्तृत्व आहे. चांगली माणसे घडविणे हे फार अवघड काम आहे. ते भाऊ शेवटपर्यंत करीत राहिले.

श्रवण केलेले मनात घेणे आणि त्याचा साधकबाधक विचार करून आत्मस्वरुपाचा निश्चय करणे याला मनन म्हणतात. अध्यात्म
त मननाला फार महत्व आहे. मननाने अधिकतम आपण आपल्याला तपासतो. आत्मज्ञान्यांच्या सानिध्यात केलेले मनन अनुभवी करते. ते आत्मानात्मविवेक देते. मननाने विद्वत्ता वाढत नाही; तर विद्वत्तेला विनम्रतेची खोली मिळते. मननात मन असते. ते कळायला अभ्यास, श्रवण, परीक्षण, आकलन हे लागते. मन समजायला मनन हवे. बऱ्याचदा जैनहिल्सच्या टेकडीवर, पाण्याच्या काठी किंवा कामाच्या

# भवरलालजींना लढण्याची ताकद संतसाहित्यातून

संत आणि संतसाहित्य यावर भाऊंची नितांत श्रद्धा होती. पूज्य मधुस्मिताजी यांनी ६० व्या वर्षात जेव्हा पदार्पण केले तेव्हा १२ नोव्हेंबर २०१० रोजी भाऊंनी त्यांना शुभेच्छा देणारे एक पत्र पाठविले. या पत्रात त्यांनी ''कठीण समस्येवर, निर्विकार व सोपा मार्ग शोधायचा असेल तर संतांच्या मधुरवाणीचे श्रवण करावे. अध्यात्म आणि वास्तव यांचा त्यात मिलाफ असतो,'' असे नमूद केले आहे. संतांनी विश्वाचे पुस्तक मनापासून अभ्यासिले. त्यांना जगाचे जीवनसूत्र आपल्या भूमीत सापडले. त्यांनी सर्वप्रथम माणसातला 'मी' शुद्ध केला. त्याला खऱ्या अर्थाने शुद्धीवर आणले. आयुष्यात काय करायला पाहिजे? आणि काय करायला नको? याचा विवेक संतांच्या जीवनातून आणि संत साहित्यातून मिळतो. एका अर्थाने संतांचे मार्गदर्शन हा मानवी व्यक्तित्वाने देवत्वाकडे जाण्याचा घेतलेला सकारात्मक श्वास आहे. संतांचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. संतांनी आपल्याला जीवनाची प्रेरणा कशात आहे? याचे सुस्पष्ट भान दिले. संतांनी आपले जीवन तीर्थांपेक्षाही अखंड निर्मळ आणि प्रवाही ठेवले. म्हणून संतांचा जयघोष हा मानवी मनाला उभारी देतो. संतांनी स्वत:कडे कोणतेही श्रेय घेतले नाही. ते समाजाच्या हितासाठी सतत उभे राहिले. संतांचा हा गुणधर्म भाऊंनी देखील उचलून स्वत:च्या जीवनात अंगीकारला. शेतकऱ्याचा प्रक्रिया केलेला पांढरा कांदा परदेशी बाजारपेठेत गेलाच पाहिजे यासाठी परदेशातल्या मोठमोठ्या कंपन्यांशी संघर्ष करून, प्रसंगी प्रचंड तोटा सोसून भाऊंनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कांदा निर्यातीचे युद्ध सक्षमपणे लढून जिंकले. यासाठी लढण्याची ताकद व उर्मी संत साहित्यानेच भाऊंना दिली. त्यामुळेच ''अशक्य कोटीतील असलेली गोष्ट जे लोक खरी ठरवितात, त्यांनाच आपण संत किंवा महात्मा म्हणावे,'' असे भाऊंनी लिहून ठेवले आहे.




साईटवर शांतपणे बसून भाऊ काही काळ मनन करीत. मनाचा आवाज ऐकू यायला अगोदर हलके व्हावे लागते. निव्वळ जड-भारी असून भागत नाही. वृत्तीमधली चंचलता उपयोगाची नसते. एकाग्रपणे इंद्रियांना लववून मनाचा खोल खोल विचार करू लागलो की मननाचा आरंभ होतो. मन म्हणजे फक्त माणसापुरता विचार असे नाही. मनात सृष्टी, विश्व, कुतुहल, जिज्ञासा असे येते. स्वत:चे मन अगोदर स्वत:ला समजणे अवघड व दुर्गम आहे. मग दुसऱ्याचे मन केव्हां कळणार! आधी मन कळावे; मग ते वळावे, नंतर सखोल चिंतनात रमावे ही सर्वांना सहजपणे साध्य होणारी गोष्ट नाही. भाऊंनी ती मोठ्या महत्प्रयासाने प्राप्त केली होती. त्यामुळेच इतक्या अल्पावधीत ते असंख्य नवनवीन गोष्टी करू शकले. मात्र या सर्व गोष्टी करताना शेतकऱ्यांची आर्थिक



बहुगुणी आवळ्याचे निरीक्षण करताना भवरलालजी

उन्नती हाच त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी शास्त्र म्हणजे विज्ञान, ज्ञान आणि तंत्रज्ञान यांची त्यांनी जी बेमालूम पद्धतीने सांगड घातली त्याला तोड नाही.

कुठल्याही विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी विचार व कृती करण्याअगोदर भवरलालजींनी निव्वळ पिकपद्धतीमध्ये नव्हे तर लागवड पद्धतीतही आमुलाग्र बदल करणारे शास्त्र विकसीत करून हायडेन्सिटी आणि अल्ट्राहायडेन्सिटी (सघन व अती सघन लागवड) म्हणजे एकरी ७०० ते १२५० झाडे बसविण्याचे तंत्र शेतकऱ्याच्या शेतावर नेऊन पोहोचविले. ठिबक संचामधून द्रवरूपखते देण्याची पद्धती सुरू करून शेतकऱ्याला ही द्रवरुप खते सुरूवातीच्या काळात उपलब्ध करून दिली. त्यांचा वापर कसा व किती प्रमाणात करावे हे शिकविले. ॲटोमेशनचे तंत्रही त्यासाठी विकसीत केले. या सगळ्या कामाचा मुख्य पाया विज्ञान हाच आहे. आपल्या आंतरिक इच्छेला विज्ञान व संशोधनाची जी क्रांतिकारी जोड भाऊंनी दिली. त्यामुळे केळी, डाळिंब, कांदा, आंबा किंवा अन्य कोणतीही पिके घेणारा शेतकरी असो त्याच्या जीवनात भाऊंनी चैतन्याची व समृद्धीची पहाट फुलविली आहे. आपण शेतीत टिकून राहावे; तिच्या सेवेतूनच आपला विकास होणार आहे असा आत्मविश्वास शेतकऱ्यांमध्ये त्यामुळे निर्माण झाला आहे. भाऊंच्या या कार्याचे मूल्यमापन करायला शब्द अपुरे पडतील. किंबहुना ते अवर्णनीय आहे. विज्ञानात विविध प्रयोग करायला मननाची गरज असते. मननाने मन मोठे होते. ते अनेक मनांना जोडते. मन जोडण्याला अध्यात्मात फार मानतात. असे मन देवाचे असते. ते अलौकिक असते. भाऊंचे मन तसेच होते.

निदिध्यास ही अध्यात्मातली तिसरी पायरी आहे. मननाने माणसात आत्मविश्वास येतो. यातून तो आत्मविचारात गढतो. आत्मविचार म्हणजे आत्म्याबद्दलची सूक्ष्म जाणीव. आत्म्याच्या सतत चिंतनशील प्रक्रियेस निदिध्यास म्हणतात. सत्संगातील सुसंवादातून मिळालेले व स्वत:तल्या मननातून विचाराने निश्चित केलेले ज्ञान निदिध्यासात येते. ते जेव्हा प्रत्यक्ष जीवनात प्रकटते तेव्हा जगण्यातला जिवंतपणा आंब्याच्या झाडाला लदबदलेल्या मोहोरासारखा फुलून येतो. आत्मचिंतनातून आत्मज्ञान स्त्रवते. यालाच संत ज्ञानदेव 'स्वसंवेद्य' असे म्हणतात. स्वत:तल्या संवेदना अर्थपूर्ण आकळतात. मननातला 'स्व' हे सारे समजायला सहाय्य करतो. याचा अर्थ अध्यात्म व विज्ञान दोन्हीही अनुभवाला प्राधान्य देतात. भाऊंचे सारे जीवन आणि त्यांनी उभी केलेला उद्योगाचा डोलारा हा अनुभवाचा यज्ञ आहे. इंद्रियांनी निरीक्षण करून बुद्धीच्या निकषांवर ते तपासणे हे विज्ञानाचे काम आहे. इंद्रियांच्या पलीकडे जाऊन विश्वाचा वेध घेणे आणि जीवनाचे सर्वोत्कृष्ट मूल्य सांगणे हे अध्यात्माचे काम आहे. परीक्षणावर विज्ञान आधारित आहे. विज्ञानाचे व अध्यात्माचे भांडण नाही. हे भाऊंनी कृतीतून सिद्ध केले. माणसाच्या जिज्ञासेत सूक्ष्माचा शोध घेण्याची जी लालसा आहे ती अध्यात्माने तृप्त होते. धर्माचे पर्यवसानही अध्यात्मात होते. विज्ञान भौतिकीत अधिक रमते. अध्यात्म अंतरंगात अधिक खुलते. चिरंजीव मूल्यांचा शोध अध्यात्म घेते. त्यामुळेच भाऊंना अमळनेरच्या साने गुरुजी विद्यालयात झालेल्या प्रकाशभाई मोहाडीकरांच्या सत्कारात **''कोणी ईश्वर कुठे पाहिला आहे काय? जे पवित्र, स्वच्छ-सुंदर, महनमंगल, साधनशुचितेने परिपूर्ण, सात्विकतेने ओथंबलेले, विचाराने, सत्‌आचरणाने सुसंस्कृत अशा सर्वोत्तमात 'देवत्व' रुजलेले आहे,''** असे वाक्य सुचले. अध्यात्म आणि विज्ञान या दोन्हीचा अर्क भाऊंच्या जीवनात किती ओतप्रोत भरलेला होता हे ''निरंतर पूजा करायची इच्छा असेल तर गुणवत्तेला पूजा! गुणवत्तेचे पुजारी बना,'' या वारणानगर येथील शेतकरी आणि सहकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांशी २००१ मध्ये सुसंवाद साधताना भाऊंनी केलेल्या विधानावरून दृष्टोत्पत्तीस येते.

अध्यात्म आणि विज्ञान एकमेकांना पूरक आहेत. ज्ञानेश्वरीच्या ११ व्या अध्यायात ओवी आहे.

**''परि कोणें माने विशाळ। जैसें तुटलिया अंतराळा।**
**आकाशासि कव्हाळ। पडोनि ठेलें।।''**

याचा अर्थ- 'पण ही तुझी मुखे कशाप्रमाणे अतीविशाल





# भाऊंचे जीवन म्हणजे 'मीपणा'ची पानगळ आणि 'आपणा'तला वसंतऋतू

भवरलालजींचे आयुष्य प्रयोगशील होते. ते कधीही स्वस्थ बसलेले दिसले नाहीत. त्यांच्या मनात सतत कशाचे तरी चिंतन चालू असे. जगण्याची त्यांची प्रयोगशाळा निराळीच होती. ते अखंड संशोधन व निरीक्षणात निमग्न असत. निरीक्षणातील काही गृहीते ते अभ्यासातून तपासत. अभ्यासातून काही महत्वाचे निष्कर्ष हाती लागले की ते कसोशीने मननाच्या कसोटीवर तपासत. हे सारे ते वस्तुनिष्ठतेने करीत. जीवनात वस्तुनिष्ठतेबरोबरच आत्मनिष्ठाही लागते. त्यामुळे जगायच्या विकासकक्षा वाढतात. जगण्याचे शरीरभान विज्ञान देते, नि आत्मिक विकासाचे भान विद्या व कला देतात. जगण्याच्या अनुभवातली घनता प्रयोगशीलतेतून येते. म्हणून प्रयोगप्रमाणता हा भाऊंचा धर्म होता. धार्मिक नेहमी प्रयोग रक्षक असतो. धर्मातल्या धारणेतून जीवनावर सतत नवनवीन प्रयोग करीत भाऊ समाजाला अज्ञानातून सोडवित राहिले. विकास व उन्नतीच्या नवनवीन वाटा दाखवित जाणिवांना सजग करीत राहिले. प्रयोग या शब्दामध्ये 'प्र' हा उपसर्ग आहे. 'योग' मध्ये 'युज्' हा धातू आहे. 'युज्' म्हणजे जोडणे. जो समाज आणि अभ्यास यांना जोडतो; तो प्रयोग. यालाच अध्यात्मात प्रवृत्ती आणि निवृत्ती यांना जोडणे म्हणजे योग होय असे म्हणतात. जगण्यातली स्वाभाविकता योगात प्रकटते. अनुभवाने आत्मा जोडतो. व्यवहारातल्या चारित्र्याने माणूस जोडतो. तो प्रयोगक्षम असतो. अशाची कदर समाज करतो. प्रयोगासाठी मनाची जागा आवश्यक असते. मनापासून कामाची तळमळ हवी. भाऊंनी स्वतःच्या जीवनावर सत्याचे प्रयोग करून श्रम, अभ्यास, स्वाभिमान आणि चारित्र्य हे चार नवे आश्रम आपल्याला दिले. त्यांचे हे जगणे व ही देणगी ही जीवनाची विशाल प्रयोगशाळा होती. त्यांचे जीवन म्हणजे 'मीपणा'ची पानगळ होती; नि 'आपणा'तला वसंतऋतू होता.

पसरलेली आहेत असे म्हणशील; तर ज्याप्रमाणे अंतराळ तुटून आकाशास जणू काय भगदाड पडले आहे.' ही संत ज्ञानेदवांची कल्पना आणि डॉ. स्टीफन हॉकिंग यांची कृष्णविवरावरील मते यात विलक्षण साम्य आहे. सूर्याच्या कित्येकपट वस्तुमानाच्या ताऱ्याची; सर्व गोष्टी स्वाहा करणारी बिंदूवत विलक्षण अंतिम अवस्था म्हणजे कृष्णविवर. संपूर्ण सृष्टीतील प्राणिजात हे विश्वमुखाने (हे भगवंता! तुझ्या मुखाने) ग्रासले जात आहे. आणि हा विश्वरूप भगवान जागच्या जागी स्वस्थपणे त्यांना गिळतोय. हे ज्ञानदेवांच्या महाप्रतिभेला झालेले विश्वरुपदर्शन म्हणजे कृष्णविवर आहे. ''अरे, तू या वीरांना काय मारणार! मी यांना आधीच मारलेले आहे. तू निमित्तमात्र आहेस,'' असा टोला श्रीकृष्णांनी अर्जुनाला मारला आहे. याचा मतितार्थ असा आहे. प्रत्येकाने आपले काम चोखपणे पार पाडावे. 'माझ्यामुळे हे सारे घडतेय,' असा वृथा अभिमान बाळगू नये. कारण या विराट विश्वातले आपण य:कश्चित कण आहोत. ब्रम्हांड अफाट आहे. ते कृष्णविवराकडे सरकतेय, हे भान म्हणजे अध्यात्म आणि विज्ञान यांचा सुरेख मिलाफ आहे. ज्ञानदेवही हे बघतात आणि डॉ. हॉकिंगही हे बघतात. दोघांच्या बघण्यातली चेतनेची पातळी एक आहे. अभिव्यक्तीत आणि साधनांबाबत फरक आहे. पण हे दोघे शेवटी एकाच बिंदूपाशी येतात. हा जाणिवेचा जाणतेपणा जपला पाहिजे. तो जाणीवपूर्वक अभ्यासला पाहिजे. यातून मनाचे उन्नयन घडणार आहे. याची यथार्थ जाणीव भवरलालजींना होती.




भगवान श्रीकृष्णांवर त्यांची नितांत श्रद्धा व गाढ विश्वास होता. १२ जानेवारी, २००८ रोजी जळगावच्या जैन हिल्सवर अनिवासी भारतीयांपुढे बोलताना भाऊंनी **''पृथ्वीच्या पाठीवर श्रीकृष्णासारखा लोकव्यवहारात इतका निष्णात मुत्सुद्दी मी अजून पाहिला नाही. त्याचे तत्वज्ञान कृतिप्रधान आहे,''**



**टिश्यूकल्चर केळीच्या बागेत शेतकऱ्यांशी संवाद साधताना भवरलालजी**

असे उद्‌गार काढले होते. जैन गुरुकुलकडे जाणाऱ्या रस्त्यावर भाऊंनी मुरली वाजविणाऱ्या कृष्णाची अत्यंत देखणी, सुबक व उत्तम कलाकुसर असलेली जी संगमरवरी पांढरीशुभ्र मूर्ती बसविली आहे ती कृष्णप्रेमाचे तर प्रतीक आहेच पण त्यापेक्षाही दूधदूभते वाढविणाऱ्या आणि शेतकऱ्यांना आधार देऊन त्याच्या संसारात आनंद व सुखसमाधानाचे माठ भरभरून वाहणाऱ्या कर्तृत्वसंपन्न प्रेमिकाचे हे प्रतिक आहे. हे कळायला जशी भक्ती लागते तसे अध्यात्म आणि विज्ञानात शुद्ध बुद्धी लागते. यात स्वार्थ बाजूला असतो. योग्यायोग्यतेचा निर्णय शुद्ध बुद्धी देते. ज्याच्यापाशी उदारता, सहिष्णुता आणि चिंतनशीलता असते तेथे अध्यात्मात विज्ञान असते. मी माझ्या ज्ञानाचा उपयोग राष्ट्रहितासाठी करीन ही वैज्ञानिकाची शुद्ध बुद्धी हे त्याचे अध्यात्म असते. मी माझ्या सृजनाचा, सर्व प्रयोगांचा व दूरदृष्टीचा उपयोग मानवजातीच्या कल्याणासाठीच करीन ही आध्यात्मिकाची बौद्धिक धारणा विज्ञाननिष्ठ असते. भवरलालजींचे विचार व प्रत्येक कृतीत या धारणेचेच अंश व बीजे दिसतात. त्यामुळे त्यांच्या समग्र व्यक्तिम त्त्वाकडे पाहू लागलो की एक उद्योजक शेतकरी, संशोधक, शास्त्रज्ञ, विचारवंत, नाविन्याची आस व ओढ असणारा विद्यार्थी, सर्जनशील निर्माता, प्रतिभाशाली लेखक व विचारवंत अशी निरनिराळी रूपे समोर उभी राहू लागतात. आपली पत्नी कांताबाई हिच्या

जैन हिल्सवरील कृष्णमूर्ती



जैन हिल्सवरील सरस्वतीमूर्ती



निधनानंतर भाऊंनी लिहिलेले 'ती आणि मी' हे पुस्तक पत्नीप्रेमाचे उत्कृष्ट प्रतिक आहेच पण त्यापेक्षाही पुस्तकातून घडणारे भाऊंच्या प्रतिमेचे दर्शन व प्रत्येक घटनेकडे पाहण्याचा बारकावा हा शुद्ध बुद्धीचा प्रातिनिधीक नमुना आहे. प्रतिभेचे बुद्धीशी वैर नाही. प्रतिभा म्हणजे बुद्धीचे अत्यंत शुद्ध व सूक्ष्म रूप. सॉक्रेटिस प्रतिभेला 'हृदयातील देवतेचा आवाज' मानतो. प्लेटो प्रतिभेला 'दिव्यवेड' तर ॲरिस्टॉटल 'शुद्धबुद्धी (नाऊस)' म्हणतो. स्पिनोझा 'सूक्ष्म बुद्धीचे ज्ञान' तर बर्गसाँ 'अंत:स्फूर्ती' असे नाव देतो. भाऊ 'वात्सल्यमूर्ती' या शब्दात आपल्या पत्नीचा उल्लेख करून 'ती आणि मी' मध्ये स्वत:च्या सुफळ संसारासंबंधी जो परिच्छेद त्यांनी लिहिला आहे तो आज आमच्या सर्वांचे उद्‌बोधन करणारा आणि भाऊंच्या कुटुंबवत्सल प्रितीचे दर्शन घडविणारा आहे. भवरलालजी लिहितात.

**''आमचं दाम्पत्य जीवन अगदी सहज व नैसर्गिक पद्धतीनं विकसित झालं. त्यात कुठलाही कृत्रिमपणा नव्हता. आम्ही आमच्या भावी स्वप्नांना मूलभूत मानून त्यांच्या पूर्ततेसाठी पछाडलो गेलो होतो, तोच आमच्या संबंधांचा मूलाधार ठरला. त्यामुळे सर्वसाधारणपणे ज्या प्रमेयांना धरून अलिकडची बहुतांश जोडपी आपला संसार घडवतात, ती प्रमेयं आम्हाला लागूच पडली नाहीत. आमचे ऋणानुबंध विकसित झाले, उदात्त झाले, उत्तुंग झाले. आम्हाला स्वत:चा विसर पडला. आमची प्रार्थना, पूजा, आमचं मंदिर आणि आमचा देवही एकच झाला नव्हे; आमच्या या संस्कारानं आम्ही दिव्यतेचा अनुभवच घेत राहिलो''** (पा.१९३)

कालांतरानं 'कांताबाई कोण होत्या?' असं विचारणाऱ्यांनी पाहावं, कांताबाईनं संस्कारित केलेल्या, 'ती आणि मी'च्या गुण्यागोविंदाने एकत्रितपणे नांदत असलेल्या चार पुत्रांकडे, सुनांकडे, नात-नातींकडे, एवढंच नव्हे; तर सुखासमाधानाने प्रेमाच्या अदृश्य धाग्याने बांधल्या गेलेल्या भल्यामोठ्या विस्तारित जैन कुटुंबाकडे व सामाजिक बांधिलकी जोपासलेल्या जैन उद्योगविशाकडे.

आणि 'भवरलाल जैन कोण होते?' अशी माझी ओळख कुणी मागितली तर त्याला उत्तर मिळावं : 'ती आणि मी' या भावस्पर्शी शिलालेखातून भारतीय संस्कृतीची आंतज्योंत तेवत ठेवणाऱ्या 'ती'ला ज्यांनी अक्षर केलं, त्या कांताबाईंचे ते पती होते.

भवरलालजी आणि सौ. कांताबाई



विश्वात दोन महासत्ता आहेत एक जड म्हणजे दृश्य आणि दुसरी सूक्ष्म म्हणजे अदृश्य. सूक्ष्म जडाला व्यापते आणि दृश्याला उत्पन्न करून त्याचा व्यवहार करते. हे अध्यात्म आहे. यावरून अध्यात्मात सूक्ष्माचे महत्व खूप आहे. हे सूक्ष्मतमरूप विज्ञान काही प्रमाणात स्वीकारते. परंतु सूक्ष्माकडून जडाकडे येणे हे अध्यात्म आहे आणि जडाकडून सूक्ष्माकडे जाणे हे विज्ञान आहे. विश्वाला या दोघांची गरज आहे. हे विश्वाचे दोन हात आहेत. हातात हात घालून जर आपण निष्ठेने पुढे चाललो तर विश्वाचे नक्की कल्याण होईल. अध्यात्म आणि विज्ञान ही विश्वाची जुळी भावंडे आहेत. त्यांना गुण्यागोविंदाने वागविण्याचे काम आपले आहे. याची जाणीव भवरलालजींना फार पूर्वीच झालेली होती. त्यामुळे त्यांनी आयुष्यभर या जुळ्या भावंडांना डोळ्यात तेल घालून जपले, सांभाळले आणि वाढविले. जगाची सुंदरता या दोहोत आहे हे कळल्यामुळे 'सुंदर ते ध्यान' हा अनुभव भाऊंना आला. भाऊ विश्वाचे मार्गदर्शक झाले. शेतकऱ्यांचे तारणहार झाले. शेतीमाल प्रक्रिया आणि करार शेतीचा देशात कुठेही विषय निघाला की भवरलालजींचेच नाव सर्वप्रथम सर्वांमुखी येतो. हीच अध्यात्म व विज्ञानावर त्यांनी ठेवलेल्या श्रद्धेची किमया आहे.



## उत्कृष्टतेच्या शिखराकडे जाण्याचा प्रयत्न

ज्ञान आणि कर्म याची उत्कृष्ट सांगड भवरलालजींनी त्यांच्या आयुष्यात प्रयत्नपूर्वक बसविली होती. त्याला अध्यात्म आणि विज्ञान याचाच आधार व पाठिंबा होता. प्रकृतीप्रमाणे ते कर्म करीत राहिले. ती कर्मे अध्यात्म आणि विज्ञानाच्या कसोटीवर तपासून उत्कृष्टतेच्या शिखराकडे जाण्याचा प्रयत्न करीत राहिले. पण कर्माविषयी कधी तक्रार केली नाही. 'आज मी प्रचंड काम केले आहे' अशी अहंकाराची भाषाही वापरली नाही. आपल्या कामाचा उदोउदो व्हावा असा हव्यासही त्यांनी कधी धरला नाही. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू आणि भारतात औद्योगिकरणाचा प्रामाणिकपणे प्रचंड विस्तार करणारे जे.आर.डी. टाटा हे त्यांचे आयुष्यातले दोन मोठे आदर्श होते. त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून पुढे जाण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळेच भाऊंचे कर्तृत्व व्यापक झाले. त्यांचे सर्व व्यवहार सामान्य माणसांसारखेच होते. म्हणजे सांसारिक आनंदात ते हसत. प्रापंचिक दु:खात त्यांचे डोळे भरून येत. कुटुंबासाठी सगळी कामे न चुकता कर्मयोगी करतात त्याप्रमाणे भाऊही करीत असत. पण त्यातही ते अलिप्त मनाने वावरत. सर्व व्यवहार आपुलकीने बघत. परंतु कर्मातली सुख-दु:खे त्यांना कधीही बाधक झाली नाहीत. कारण ते कर्म करूनही अकर्ते होते. त्यामुळे नि:संग भावनेने होणारी त्यांची कर्मे सर्वात्मक परमेश्वराला आवडत असत. कारण त्यात अंहकर्तृत्वाचा वास नव्हता. कर्म करीत असताना मीपणा कुठेही येत नाही, तो त्यांच्या अस्तित्वाचा खरा आत्मा होता. आजही कर्मातील ईश्वरत्व त्यांच्या रुपाने प्रकटते. त्यांची आठवण येत नाही असा एकही दिवस जात नाही. सेवेतून व्यक्त झालेली त्यांची अभिव्यक्ती आत्म्याचा प्रकाश वाटतो. त्यांच्या जाणिवेचा हा कोश मनामनांना प्रसन्नतेचा प्रसाद वाटतो. इंद्रिये, भावना, संवेदना ही अंगभूत अस्तित्वे कर्मात विरघळतात. म्हणून नम्रपणे म्हणावेसे वाटते-

'आम्ही करीत नाही. भाऊ करवून घेतात. आम्ही निमित्तांच्या समिधा आहोत.'



# भाऊ
# प्रयोगक्षम सत्यव्रती

– डॉ. माधवराव चितळे

आंतरराष्ट्रीय किर्तीचे जलतज्ज्ञ आणि नोबेल पारितोषिकाच्या समतुल्य मानल्या जाणाऱ्या स्टॉकहोम जल पुरस्काराचे मानकरी डॉ. माधवराव चितळे आणि जैन उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री डॉ. भवरलाल जैन यांची घनिष्ठ मैत्री होती. दोघांना एकमेकांबद्दल प्रचंड आदर, आपुलकी व जिव्हाळा होता. भवरलालजींच्या ८२ व्या जयंतीनिमित्त डॉ. माधवराव चितळे यांची डॉ. सुधीर भोंगळे यांनी घेतलेली ही विशेष मुलाखत.

**प्रश्नः भवरलालजींचा परिचय कसा व केव्हा झाला?**

**चितळे**– महाराष्ट्र शासनाने १९९६ मध्ये शेती–पाणी या प्रश्नांचा अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी दुसरा जल व सिंचन आयोग नेमला होता. त्या आयोगाचा मी अध्यक्ष होतो आणि भवरलालजींना आयोगाचे सदस्य नेमण्यात आले होते. ठिबक सिंचनाचे तंत्रज्ञान १९८७ मध्ये भारतात सर्वप्रथम भवरलालजींनीच आणले होते. त्यांचा शेती–पाणी या प्रश्नांचा चांगला अभ्यास होता. त्यांनी स्वतः शेतीत असंख्य नवनवीन प्रयोग केले होते. शिवाय उद्योग धंद्याचा मोठा अनुभवही पाठिशी होता. त्यामुळे राज्य सरकारने त्यांची तज्ज्ञ सदस्य म्हणून आयोगात नेमणूक केली होती. आयोगाच्या पहिल्या बैठकीत त्यांचा माझा परिचय झाला आणि त्यातूनच ऋणानुबंध जुळले.

आयोगाच्या कामाच्या निमित्ताने महाराष्ट्रभर एकत्र हिंडणे झाले. खूप प्रवास केला. अनेक जिल्ह्यांमध्ये गेलो. निरनिराळ्या प्रकल्पांना भेटी दिल्या. खूप लोकांनी केलेले वेगवेगळे प्रयोग पाहिले. पाण्याशी संबंधीत असलेल्या अनेक विषयांचा तपशील गोळा करताना विविध क्षेत्रातल्या प्रयोगशील व जाणकार व्यक्तींशी चर्चा झाल्या. या सर्व चर्चांना आणि दौऱ्यांना भाऊ आवर्जून उपस्थित राहायचे.

या दौऱ्यांसाठी आम्ही एक मिनीबस भाड्याने घेतली होती जेणे करून सर्व सदस्यांना एकाच गाडीतून चर्चा करीत जातायावे व अधिक काळ एकमेकांच्या सानिध्यात व सहवासात राहता यावे हाच त्यामागचा उद्देश्य होता. भवरलालजींच्या हाताशी सगळ्या सोयीसुविधा असतानाही ते या बसमधूनच प्रवास करायचे आणि मुख्य म्हणजे बसमध्ये माझ्या शेजारीच बसायचे. त्यामुळे अनेक विषयांवर त्यांच्याशी तपशीलात चर्चा व्हायची. विचारांची सतत देवाण–घेवाण चालू असायची. त्यांचा अनुभव, अभ्यास, चिंतन, मनन आणि निरीक्षण शक्ती दांडगी असल्यामुळे त्यांची प्रत्येक विषयावर ठाम मते होती. ती मते मांडण्यास ते कचरत नसत. आपली मते कोणाला पटतील, कोणाला पटणार नाहीत याचा त्यांनी कधीही विचार केला नाही. तसे ते स्पष्ट वक्ते होते. त्यामुळे बोलण्यास ते कचरत नसत. पण अत्यंत सभ्य भाषेत ते आपले विचार मांडीत. त्यांचे बोलणे मलाही रूचत असे.

**प्रश्नः भाऊ प्रामुख्याने कोणत्या विषयांवर बोलत? आणि त्या बोलण्यामागचा त्यांचा हेतू काय असे?**

**चितळे**– कृषी, सिंचन, शिक्षण आणि सामाजिक मंचावरून हाताळले जाणारे विषय यासंबंधी भाऊ प्रामुख्याने बोलत. त्याबाबत त्यांनी खूप विचार केलेला असे. बहुधा समर्थ रामदासांची–

**अभ्यासोनी प्रकट व्हावे। नाहीतर झाकोनी असावे।**
**प्रकट होऊनी नासावे। हे बरे नव्हे।।**

ही उक्ती त्यांनी अंगात चांगली मुरविली असावी. त्यामुळे वायफळ, फुटकळ, पाल्हाळीक ते बोलतच नसत. भाऊंचे बोलणे अत्यंत मोजून, मापून व विचारपूर्ण असे. अत्यंत चपखल आणि कोंदणात बसतील असेच शब्द ते बोलताना आणि लेखनातही वापरीत. एकच शब्द पुन्हा पुन्हा वापरणे त्यांना पसंत नसल्यामुळे

**माधवराव चितळे आणि भवरलाल जैन यांना कवि ना. धों. महानोर यांच्या निवासस्थानी कुंकुमतिलक लावून औक्षण करताना सौ. सुलोचना महानोर**



अनेक पर्यायी शब्दांचा खजिना त्यांनी जवळ बाळगला होता. एखाद्या वेळी त्यांना अचूक पर्यायी शब्द मिळाला नाही तर ते अस्वस्थ होऊन शब्दकोश, डिक्शनरीत शब्द शोधत. पण नवीन शब्द शोधूनच काढत.

आज समाजाचे सर्वच क्षेत्रात फार मोठे अधःपतन होते आहे. गुणवत्ता कमी कमी होते आहे हे त्यांच्या मनात शल्य होते. त्यामुळेच मुख्यतः सामाजिक गुणवत्ता कशी उंचावेल, त्यासाठी काय करायला पाहिजे याविषयी ते फार जागृत व दक्ष होते. किंबहुना तो त्यांच्या चिंतनाचा विषय बनला होता. ढासळत चाललेली गुणवत्ता आपण वेळीच रोखू शकलो नाही तर जागतिक स्पर्धेत आपल्या देशाचा टिकाव कसा लागणार हा प्रश्न त्यांना सतत अस्वस्थ करीत असे. शेतीमाल उत्पादन, प्रक्रिया, निर्यात, करार शेती, नवीन व्हरायटी या विषयांबाबत तर ते सातत्याने बोलतच होते पण विशेष म्हणजे त्यात नेमका काय बदल व्हायला हवा या संबंधी सूक्ष्म अभ्यास त्यांनी केलेला असल्यामुळे कामाची निश्चित दिशा त्यांच्या बोलण्यातून प्राप्त होत असे. अनेक राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांपेक्षा ते वेगळे वाटायचे ते त्यामुळेच. राजकीय कार्यकर्ते पक्षाच्या दृष्टीकोनातून समाजाकडे पाहतात. सामाजिक कार्यकर्ते आपल्या संघटनेच्या विचार व कार्याची दिशा पाहून सामाजिक कार्यावर टिप्पणी करतात. परंतु भाऊ एक कर्तव्यदक्ष नागरिक किंवा सच्चा राष्ट्राभिमानी राष्ट्रभक्त या भावनेतून प्रश्नांकडे पाहात. त्यामुळे त्यांचे चिंतन वेगळेच असे आणि त्याला अनेक पैलू असत.

जैन व्हॅली येथील भाऊंच्या सृष्टी मध्ये शास्त्रीय पद्धतीने पाणलोट विकासाचे काम करून केलेला जलसाठा



वरील विषयांव्यतिरीक्त राहणीमान, कुटुंब व्यवस्था, बालपणचे शिक्षण, नातेसंबंध, विवाह, धर्म, संत साहित्य अशा अनेक विषयांवर त्यांनी खूप विचार केला होता. समाज कसा असला पाहिजे व तो कसा घडविला पाहिजे याबाबतही त्यांची काही ठाम मते होती. शिस्त हा त्यांचा आवडता गुण होता. त्याबाबत ते फार कडक होते. त्यांच्या घरी उतरणे तितके सोपे नव्हते. कारण सगळे काम टापटीप व शिस्तीतच चाले. पती–पत्नी दोघेही कडक शिस्तीचे भोक्ते होते. याचा अनुभव मी घेतलेला आहे. त्यांच्या घरी मी राहिलेलो आहे. सगळ्या गोष्टी कशा पद्धतशीर व्हायला पाहिजेत. त्यात चाल ढकल, ढिसाळपणा त्यांना अजिबात पसंत नव्हता. शिस्तीबाबत नजर करडी होती.

**प्रश्नः कामाकडे बघण्याचा भाऊंचा दृष्टीकोन कसा होता?**

**चितळे**– एखाद्या कामावर निष्ठा कशी असावी हे भवरलालजींकडून शिकावे. एखादे काम हाती घेतले तर ते त्यात पूर्ण जीव ओततत. काम अपूर्ण सोडायचे नाही. निकृष्ट प्रतीचे करायचे नाही. कामात सर्वोत्कृष्टताच (एक्सलन्स) गाठायची हा त्यांचा निर्धार असे. कामात कोणतीही संकटे किंवा समस्या आल्या तर त्याला धैर्याने तोंड देऊन त्यावर प्रभावीपणे मात करायची हे त्यांना चांगले अंगवळणी पडले होते.

आयोगात सदस्य म्हणून येण्यापूर्वीच भाऊंना हृदयाचा त्रास सुरू झाला होता. खूप तरूण वयात त्यांना हृदयविकाराने धरले होते. पण ते आजाराने कधी खचले नव्हते. मोठा जिद्दीचा माणूस.




निसर्गाच्या प्रेमळ कुशीत वसलेले पवित्र श्रद्धाधाम

डॉक्टर बरोबर घेऊन सगळीकडे हिंडायचे. आपण स्वीकारलेल्या जल व सिंचन आयोगाच्या कामाच्या आड आपले दुखणे येऊ नये म्हणून सावधगिरीचा उपाय करीत. ते डॉक्टर, अटेंन्डंट, औषधांची बॅग सगळीकडे बरोबर ठेवत. त्यांच्यासाठी वेगळी गाडी ठेवत. ती गाडीआमच्या बसच्या मागे चाले. भाऊ मात्र स्वतःच्या गाडीत न बसता आमच्या सर्वांसोबत बसमध्ये बसत. सगळीकडे मोकळेपणाने हिंडत. स्वतःसाठी वेगळ्या व्यवस्थेचा आग्रह त्यांनी कधीही धरला नाही. किंबहुना ते स्वतःची वेगळी उत्तम व्यवस्था स्वतः प्रत्येक गावात करू शकले असते. तेवढी यंत्रणा पैसा त्यांच्याकडे उपलब्ध होता. पण त्यांनी तसे कधीही केले नाही. आम्ही जी व्यवस्था केलेली असायची तीच त्यांनी गोड मानून घेतली. त्याबद्दल कधीही तक्रार वा कुरकुर केली नाही. आयोगाच्या दौऱ्यात सगळीकडे जेवण अगदी साधे असायचे. त्यांनी स्वतः साठी कधीही वेगळे जेवण मागितले नाही आणि बाहेरून मागविलेही नाही. वास्तविक त्यांना हृदयविकाराच्या आजारामुळे खूप पथ्ये होती. त्यांनी ती पाळणेही आवश्यक होते. परंतु त्यांनी आम्ही जे खाऊ तेच खाल्ले. आयोगामुळे मला दोन घट्ट मित्र मिळाले. एक भवरलालजी जैन आणि दुसरे नासिकचे बाळासाहेब वाघ. आमचा तिघांचा अंतर्गत गट होता. आमच्या तिघांचे फार जमायचे हे आज तुम्हाला मोकळेपणाने सांगतो.



**प्रश्नः पाणी वापर व नियोजनासंबंधी भाऊंचे विचार कशा प्रकारचे होते?**

**चितळे**– पाणी हा भाऊंच्या जिव्हाळ्याचा व आवडीचा विषय होता. पाण्यासंबंधी त्यांनी फार प्रदीर्घ चिंतन केले होते. जगातील अनेक देशांच्या पाणी प्रश्नासंबंधी त्यांनी अभ्यास केलेला होता. पाण्याचा काटकसरीने व वैज्ञानिक वापर करण्यावर त्यांचा फार भर होता. १९८७ मध्ये भवरलालजींनी पहिल्यांदा इस्राईल मधून ठिबक सिंचनाचे तंत्रज्ञान भारतात आणले. त्यावेळेला त्यांनी या तंत्रज्ञानासंबंधी इस्राईलशी केलेला करार हे मोठे धाडसच मानले पाहिजे. कारण त्यावेळेपर्यंत या तंत्रज्ञानाचा वापर करून पाण्याची बचत व काटकसर करायची याची कल्पना भारतातल्या शेतकऱ्यांना जवळपास नव्हती आणि हे नवे तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या गळी उतरविणे ही फारशी सोपी गोष्ट नव्हती. भाऊंनी या तंत्रज्ञानाचा प्रसार व प्रचार करण्याचे आव्हान स्वीकारून त्यात ते यशस्वी झाले. आज भारतीय शेतीत व उत्पादन आणि उत्पादकता वाढीमध्ये जो



१६ जुलै १९९७ रोजी जैनहिल्सवर माधवराव चितळे यांच्या शुभहस्ते आंब्याचे रोप लावले जात असताना शेजारी डॉ. श्रीरंग कद्रेकर, डॉ. एच. बी. उलेमाले, पाठीमागे भवरलाल जैन, ना. धों. महानोर, वसंतराव शिंपी व इतर मान्यवर

आमूलाग्र बदल झालेला दिसतो त्यास ठिबक तुषार सिंचनाचे तंत्रज्ञान मुख्यत्वे कारणीभूत आहे आणि त्या तंत्रज्ञानाच्या विकासात भवरलालजींचा मोठा वाटा आहे.


आपल्याकडे किती अब्ज घनमिटर पाणी साठविले आहे. शहराला त्यातले किती पाणी दिले गेले. ते पाणी काय गुणवत्तेचे होते. ते किती वाजता व कशाने पुरविले गेले या तपशीलाकडे त्यांचे जास्त लक्ष असायचे. पिण्याचे आणि सिंचनाचे पाणी हे उघड्या कालव्यातून न सोडता बंद पाईपातूनच वाहून नेले पाहिजे याबाबत ते आग्रही होते. त्यांचा हा आग्रह रास्तही होता. कारण उघड्या कालव्यातून पाणी वाहून नेणे म्हणजे बाष्पीभवनाला, भूगर्भात पाझरून वाहण्याला, प्रदूषणाने त्याची गुणवत्ता खराब होण्याला, चोरीला प्रोत्साहन देण्यासारखेच आहे. आज आपली सिंचनाची कुशलता ३० ते ३५ टक्क्यांच्या आसपास आहे. म्हणजे धरणातून सुटलेले पाणी प्रत्यक्ष पिकाच्या मुळापर्यंत जाईस्तोवर ६५ ते ७० पाणी निरनिराळ्या कारणांनी वाया गेलेले असते. इस्राईल, ऑस्ट्रेलिया सारख्या देशात ही सिंचनाची कुशलता ९०-९५ टक्क्यांच्या पुढे आहे. अशी कुशलता आपल्याला गाठता आली पाहिजे यासाठी भाऊ खूप आग्रही होते. त्यामुळे नळपद्धतीतून पाणी वितरण या विषयावर त्यांनी खूप विचार करून त्यासंबंधी सविस्तर मांडणी आयोगाच्या बैठकीत केली होती. टाक्या, नळ, पाईप, काटकसर या गोष्टी न स्वीकारल्यामुळे आपले खूप मोठे नुकसान झाले आहे असे त्यांचे मत होते आणि ते रास्तही आहे.

शेती, घरगुती वापर आणि उद्योग यात पाण्याची काटकसर करून रिसायकलिंग, शुद्धीकरण, पुनर्वापर या गोष्टींकडे आपण काहीही लक्ष दिले नाही. वास्तविक पुनर्वापर व शुद्धीकरण ही पाश्चात्य देशांमध्ये आता मोठी इंडस्ट्री विकसीत झाली आहे. यासंबंधीचे अद्यावत शास्त्र व तंत्रज्ञान जगभर विकसीत झालेले आहे. इस्राईलने तर समुद्राच्या पाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी माणसांना पिण्यालायक करण्याचे पाच मोठे प्रकल्प उभारले आहेत आणि आणखीन दोन नवीन प्रकल्प उभारणार आहेत. आपण या क्षेत्रात काहीही काम करू शकलो नाही हे शल्य भाऊंच्या मनात होते. ते रिसायकलिंग, पुनर्वापर, पाईपातून वहन, ठिबक-तुषारद्वारेच पिकांना पाणी, मल्चिंग, बाष्पीभवन रोखणे याबाबत ते प्रचंड आग्रही होते. त्यामुळे आयोगाच्या अहवालात आम्ही हा विषय आग्रहीपणाने मांडलेलाच आहे. पण त्याशिवाय सोसायट्यांमार्फत पाणी वाटप आणि घनमापन पद्धतीने मोजून

पडीक जमीन विकासासंबंधी भवरलाल जैन माधवराव चितळे यांना माहिती देताना शेजारी डॉ. सर्जेराव ठोंबरे



जैन इरिगेशनने जळगाव येथील गिरणा नदीवर उभारलेला पहिला पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीप-कांताई बंधारा



पाणी द्यावे असे आवर्जून सांगितले आहे. २०१० पर्यंत २० हजार सोसायटया स्थापन करून हे पाणी वाटप नियंत्रित करून त्यात शिस्त आणावी असे आम्ही सुचविले होते. सर्व पाणी वाटप याच पद्धतीने व्हावे अशी आयोगाची शिफारस होती. राज्य सरकारने ती मान्यही केली होती. परंतु अद्याप तिची पूर्ण अंमलबजावणी झालेली नाही हे कटूसत्य आहे.

**प्रश्नः मोठी धरणे आणि पाणलोट विकास कार्यक्रम यासंबंधी डॉ. माधवराव चितळे आणि डॉ. भवरलाल जैन यांच्यात वैचारिक मतभेद होते असे काही लोक सांगतात. हे मतभेद सिंचन आयोगाच्या बैठकीत कधी उघडपणे प्रकट झाले का?**

**चितळे**- आमच्यात वैचारिक मतभेद होते हे खरे नाही. माझा मोठ्या धरणांना पाठिंबा आणि पाणलोट विकास कार्यक्रमाला विरोध होता हे खरे नाही. तसेच भवरलालजींचा मोठ्या धरणांना विरोध आणि फक्त पाणलोट विकास कार्यक्रमालाच पाठिंबा होता हेही खरे नाही. मोठी धरणे आणि पाणलोट विकासाचा कार्यक्रम हा एकमेकांना पूरक असून तो हातात हात घालूनच पुढे गेला पाहिजे अशी आमची दोघांचीही भूमिका होती. आपले मोसमी पावसाचे स्वरूप लक्षांत घेतले तर चार महिन्यातला पाऊस मोठ्या धरणांमध्ये साठविण्याशिवाय दुसरा पर्याय महाराष्ट्रासमोर नाही. त्यामुळे मोठ्या धरणांच्या ज्या जागा निसर्गतः उपलब्ध आहेत त्यांचा पूर्ण क्षमतेने वापर केला पाहिजे व ज्या क्षमतेची जागा आहे तेवढा पाणीसाठा





करणारे धरण बांधले पाहिजे हा आमचा विचार आहे. सगळ्या ठिकाणी मोठी धरणे होऊ शकणार नाहीत. पण जिथे होऊ शकतात तिथे ती केली पाहिजेत. कारण मोठी गावे, शहरे, तिथली वाढती लोकसंख्या, शेतीचा बारमाही पाण्याचा प्रश्न आपण मोठ्या धरण बांधणी कार्यक्रमातूनच सोडवू शकतो. यादृष्टीने पाणलोट विकास कार्यक्रमाला मर्यादा आहेत. पाणलोटातले व्यवस्थापन हे अतिशय किचकट व गुंतागुंतीचे आहे. पाणलोटातून शेतीला बारमाही सिंचन व बारमाही रोजगार पुरविणे अवघड आहे. म्हणून जिथे मोठी धरणे करणे शक्य नसेल तिथे पाणलोटाचा कार्यक्रम ‘माथा ते पायथा’ या शास्त्रीय तत्त्वानुसार राबवावा असे आमचे दोघांचेही मत होते. भाऊंनी बैठकीत मोठ्या धरणांना कधीच विरोध केला नाही. फक्त सर्व पाणी ठिबक तुषारद्वारे शेतीला द्यावे व ते पाईपातून वाहून न्यावे याबाबत ते प्रचंड आग्रही होते.

जळगावच्या जैन हिल्सवर काय काय करता येईल व वेगवेगळ्या प्रयोगासाठी ही टेकडी कशी वापरता येईल याबाबत त्यांनी माझ्याशी खूप चर्चा केली होती. एवढेच नव्हे तर दोन दिवस पूर्ण फिरून ती टेकडी मी सुरुवातीच्या काळात पाहिली होती. नंतर भाऊंनी तिथे अतिशय मेहनत घेऊन व सातत्याने उभे राहून आपल्या देखरेखीखाली पाणलोट क्षेत्र विकासाचे काम अत्यंत उत्तम पद्धतीने व शास्त्रीय तत्वाधारे पूर्ण करून घेतले. त्यामुळे पाणलोट क्षेत्र विकासाचा उत्तम नमुना म्हणून सर्वजण आज जैन हिल्सकडे पाहतात. ज्या खडकाळ, दगडी माळरानावर, डोंगरावर पाण्याचा थेंब नव्हता आणि झाडांच्या लागवड व वाढीसाठी पुरेशी मातीही नव्हती तिथे भाऊंनी प्रयत्नपूर्वक आव्हान स्वीकारून कोट्यावधी लिटर पाणी उपलब्ध केले. हजारो एकरांवर आंबा, मोसंबी, पेरू, सिताफळ, जांभूळ, केळी यांसारखी फळझाडे लावून डोंगर उतारावर बागा उभ्या केल्या. याशिवाय कडूनिंब, साग व पर्यावरणाचा समतोल राखणारी लाखो झाडे उभी केली. पांढऱ्या कांद्याची लागवड करून त्याचे बियाणे तयार केले. जैन हिल्सच्या विकासाचे जे काम भाऊंनी केले त्याला तोड नाही.

या ठिकाणी काम करीत असताना त्यांच्यात आणि माझ्यात मतभेदाचा एक विषय झाला होता तो म्हणजे बांबू लागवडीचा. माझी खूप इच्छा होती की भवरलालजींनी बांबू लागवडीच्या कामात लक्ष घालावे आणि मोठ्या प्रमाणावर बांबूची लागवड करावी. खानदेशातले तापी खोरे, अजिंठा–सातपुड्याचा डोंगराळ भाग हे सगळे अवर्षणाचे प्रदेश आहेत. येथे पडणारा पाऊस खूप कमी असून बऱ्याचदा

**शेडनेटमध्ये उभ्या केलेल्या रोपवाटिकेची भवरलाल जैन हे माधवराव चितळे यांना माहिती देताना**





# स्वयंविकसीत व्यवस्थापन तंत्राचे उद्‌गाते

**विकेंद्रीकरणाची खरी क्षमता भवरलालजींनी सिद्ध केली. केंद्रीकरणाच्या मोहात ते अडकले नाहीत. म्हणूनच त्यांचे मोठेपण जास्त उठून दिसते. प्रस्थापित वित्तीय केंद्राच्या मागे भाऊ कधीही धावले नाहीत. त्यांनी स्वत:चे व्यवस्थापन तंत्र अभ्यास, निरीक्षण, संवाद आणि अनुभव यातून निर्माण केले. स्वत:ची स्वतंत्र अशी विचार करण्याची पद्धती विकसीत केल्यामुळे बाजारातली रेडीमेड व्यवस्थापन तंत्रे त्यांना उचलण्याची गरज पडली नाही आणि कुणाची कॉपीही करावी लागली नाही. याला दमदारपणा म्हणतात. तो त्यांनी कृतीतून सिद्ध केला. सगळा जैन उद्योग समूह त्यांनी कुटुंब म्हणून चालविला. कंपनीतील कामगारांना त्यांनी कायम 'सहकारी' मानले आणि त्यांना कुटुंबाचे एक घटक असल्यासारखे वागविले. त्यामुळे कंपनीतल्या प्रत्येक कर्मचाऱ्याला ही कंपनी माझी आहे, मीच तिचा मालक आहे ही भावना उत्पन्न झाली. कामगारांना मालकाबद्दल इतकी आपुलकी आणि प्रेम असल्याचे उदाहरण फार क्वचित पहायला मिळते. भाऊंनी मोठ्या ध्येयाने, कष्टाने व विचारपूर्वक हे प्रेम संपादित केले होते.**

परतीचा मोसमी पाऊस पडतो. त्यामुळे या भागात बांबूची लागवड केल्यास कागद धंद्यासाठी लागणारा बांबू येथे मोठ्या प्रमाणावर उत्पादित होऊ शकेल. परंतु माझा हा विचार व्यवहारात उतरणे व आर्थिकदृष्ट्या किती यशस्वी होऊ शकेल याविषयी भाऊंच्या मनात शंका होती. मी मुद्दाम त्यांना डीवचावे म्हणून गंमतीने म्हणत असे, ''तुम्ही स्वदेशीचा आग्रह धरता आणि परदेशातून आयात केलेल्या गुळगुळीत कागदावर सगळी छपाई करता. स्वदेशी कागद वापरला पाहिजे.'' माझ्या या म्हणण्याला कवी ना.धों. महानोरही पाठिंबा द्यायचे. चितळे म्हणतात ते बरोबर आहे. आपण बांबू वाढविला पाहिजे असे महानोरही म्हणायचे. पण भाऊंना आमचा हा विचार कधीच पटला नाही. अर्थात धंद्याचे अर्थशास्त्र त्यांना आमच्यापेक्षा जास्त चांगले कळत होते. त्यामुळे आम्हीही त्यांना चिडविण्यापुरताच बांबूचा विषय चघळत राहिलो. आज ते आठवले की हसायला येतं.

मोठ्या धरणांना भाऊंचा अजिबात विरोध नव्हता. हा त्यांच्याबद्दल कुणीतरी पसरविलेला गैरसमज आहे. पाण्याची आपल्याला साठवण



करायला पाहिजे. पाणी वर्षभर नियमितपणे पुरवण्यावर खूप मर्यादा आहेत हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे त्यांचा पाण्याची साठवण, काटकसरीने वापर आणि त्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार यावर भर होता. शेतीमाल प्रक्रिया उद्योग व पक्क्या उत्पादित मालाचे विपणन हे ज्या कच्च्या मालावर अवलंबून आहे त्या शेतीला संरक्षित पाणी उपलब्ध करून देण्यासाठी मोठी धरणेच लागतील याची त्यांना जाणीव होती. त्यामुळेच तसे प्रकल्प करण्याचा त्यांनी आग्रह धरला. किंबहुना त्यांनी स्वतः १५ कोटी रूपये खर्च करून गिरणा नदीवर मोठा 'कांताई' नावाचा बंधारा बांधला आणि त्यातून आजूबाजूच्या शेतकऱ्यांनाही पाणी दिले. ही त्यांची उदात्त दृष्टी नकळत खूप काही सांगणारी आहे. ते हाडाचे व्यापारी होते. बाजाराची आठवण त्यांच्या मनाशी पक्की होती. तोट्यातली शेती हे त्यांच्या डोक्यात कधीच नव्हते. फायद्यासाठीच शेती केली पाहिजे असे ते आवर्जून व आग्रहीपणाने प्रतिपादन करीत. गुळगुळीत शब्द ते कधीच वापरत नव्हते. बाजारात माल विकता आला पाहिजे आणि त्यातूनच जास्तीचे दोन पैसे शेतकऱ्याला मिळालेच पाहिजेत यादृष्टीनेच ते विषयाची मांडणी करीत.

**प्रश्नः भवरलालजीही मूळचे शेतकरीच होते. पण तरीही त्यांचा आणि सर्वसामान्य शेतकऱ्यांचा शेतीकडे पाहण्याचा जो दृष्टीकोन आहे त्याबद्दल काय सांगता येईल?**

**चितळे**– भवरलालजींचे डोके खरे औद्योगिक होते. शेतीत उत्पादित होणाऱ्या मालाकडे ते उद्योगासाठी लागणारा कच्चा माल म्हणूनच पहात असत. आपण सगळे लोक प्राथमिक उत्पादन म्हणून या मालाकडे पाहतो. परंतु माल पाहिल्याबरोबर भाऊंचे लगेच पुढचे विचार चालू व्हायचे. सेकंडरी आणि टर्शरी उद्योगात कच्च्या मालाचा वापर करून त्याची मूल्यवृद्धी कशी करता येईल व शेतकऱ्याला दोन पैसे अधिकचे कसे मिळवून देता येईल. एवढेच नव्हे तर या प्रक्रिया उद्योगातून जास्तीत जास्त लोकांना बारमाही रोजगार कसा देता येईल यात त्यांचे मन गुंतलेले असायचे. शेतातून उत्पादित झालेला माल आणि कारखान्यातून वेस्ट (टाकाऊ) म्हणून बाहेर पडणारा माल यातले काहीही वाया जाता कामा नये. त्याचा पुन्हा पुन्हा वापर करून ते निसर्गाला आपण परत दिले पाहिजे किंवा वापरात आणले पाहिजे

पांढरा कांदा बियाणे निर्मितीची पहाणी करताना भवरलालजी





ठिबक तंत्राने पांढऱ्या कांद्याचे उत्पादन

यासाठी ते आग्रही असायचे. त्याकरिता निरनिराळे प्रयोगही सातत्याने करायचे. त्यांची प्रतिभा शेतीतल्या तज्ज्ञापेक्षाही पुढची होती. शेती ही त्यांना औद्योगिकरणाचा पाया म्हणून हवी होती. पुष्कळ लोक शेतीनिष्ठ आहेत. ते फक्त शेतीचाच विचार करतात.पण उत्पादनाच्या पुढची साखळी उभी करण्याचा भवरलालजींचा विचार सतत जागा असायचा.

मला आठवते एकदा सहज सिताफळासंबंधीचा विषय निघाला. डोंगर दऱ्यातील आणि अवर्षण प्रवण भागातील या पिकाच्या



शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान भवरलालजीं सोबत समजून घेताना देवेंद्र फडणवीस

संशोधनाकडे कृषी विद्यापीठांनी किती दुर्लक्ष केले आहे असे जाहीरपणे सांगून भवरलालजींनी या पिकाचे शेतकऱ्याच्या जीवनात आर्थिक दृष्टीने किती मोठे महत्व आहे व त्याला ठिबक सिंचन आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली तर लाखो रुपये या पिकातून शेतकऱ्याला मिळू शकतात असे जेव्हां सांगितले तेंव्हा सर्वांना त्याचे नवल वाटले होते. आज भवरलालजींचे म्हणणे तंतोतंत खरे झाले आहे असे आपण पाहतो. सिताफळातील बिया कमी करणे, त्यांचा आकार लहान करणे किंवा ते बिनबियांचे करणे, पल्पचे प्रमाण वाढविणे, त्याचा टिकण्याचा कालावधी वाढविणे, फळ माशीला प्रतिबंध करणे हे व यासारखे विषय मात्र संशोधनाच्या दृष्टीने अजूनही दुर्लक्षितच आहेत.

**प्रश्नः भाऊंच्या करार शेती या संकल्पनेबद्दल आपण काय सांगाल?**

**चितळे**– कराराची शेती हा भाऊंचा अत्यंत आवडता विषय होता. त्यांनी या विषयाचा आर्थिक, कायदेशीर, व्यावहारिक, बाजारपेठी प्रक्रिया व अन्य सर्व अंगांनी बारकाईने विचार व अभ्यास केला होता. परंतु २०–२५ वर्षांपूर्वी समाजाला फारसा न आवडणारा हा विषय होता. त्यामुळे या विषयाची चर्चा कुठेही निघाली की सारेजण कान टवकारत. आपली परंपरागत विचारसरणी ही मुख्यत्वे डाव्या विचारांकडे झुकणारी असल्यामुळे करार शेतीने शेतकरी फसविला जाणार. उद्योजक शेतकऱ्याला मालाची रास्त किंमत देणारच नाही आणि ज्या दराने कच्चा माल खरेदी करण्याचे आश्वासन दिले आहे ते पाळणारच नाही असा पक्का समज होता. शेतकऱ्यांचा कायम विश्वासघात होणार आणि कायद्याचे पाठबळ नसल्यामुळे शेतकऱ्यांना कधीच न्याय मिळणार नाही अशी आवई व हाकाटी



कोल्डस्टोरेजमध्ये शास्त्रीय पद्धतीने साठविलेला पांढरा कांदा

काही लोकांकडून जाणीवपूर्वक उठविली जात होती. त्यामुळे करार शेतीचा विषय निदान आपल्या देशात तरी फार वेगाने पुढे जाताना दिसत नव्हता. आजही तो फार वेगाने पुढे जाऊन प्रगत झाला आहे असे म्हणणे थोडे धाडसाचेच आहे.

कराराची शेती शेतकऱ्यांना आणि समाजाला खूप उपयोगी आहे आणि तीच शेती छोट्या शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती करू शकते यावर भाऊंचा गाढ विश्वास होता. लहान लहान तुकडे असणारा शेतकरी खूप मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून निर्यातीसाठी आवश्यक असणारा व कंटेनर भरू शकेल इतका माल उत्पादित करू शकत नाही. पण हा लहान तुकड्यांचा शेतकरी निश्चित खात्रीने निर्यातीसाठी लागणारा माल पुरविणारा पुरवठादार होऊ शकतो. पुरवठादार होण्याचा त्याचा मार्ग करार शेती आहे. यात त्याला त्याने उत्पादित केलेल्या मालाला निश्चित हमीभाव मिळण्याची शाश्वती आहे. बाजारभाव वाढले तर चढ्या दराने भाव मिळण्याची संधी आहे आणि बाजारातले दर पडले तरी हमीभावाने पैसे मिळणारच आहेत. त्यामुळे करार शेतीत शेतकऱ्याला कोणताही धोका नाही आणि प्रक्रिया कारखानदारालाही कच्चा माल निश्चित मिळण्याची हमी आहे. भवरलालजी २००० सालापासून पांढरा कांदा या पिकात ही करार शेती राबवित आले आहेत. त्यांचे हे करार शेतीचे मॉडेल खूप यशस्वी झालेले असून त्याचे मोठ्या प्रमाणावर सर्वत्र अनुकरण होत आहे.

ही करार शेती भाऊंनी सुरू केली तेव्हा बरेच लोक त्यांना सांगायचे की शेतकरी तुमच्या विरूद्ध बंड करतील. यावर भाऊंचे उत्तर असे की, ''मी त्यांचे कोणतेही नुकसान करीत नाही, त्यांना फसवित नाही. उलट त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला मी जगाची बाजारपेठ दाखवितो आहे. माझा हेतू शुद्ध आणि प्रामाणिक आहे आणि सत्याने वागणाऱ्या माणसाला कुणाला भिण्याचे कारण नाही.'' भाऊंनी शेवटपर्यंत शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळला. त्यामुळे त्यांच्या करार शेती मॉडेलबद्दल शेतकऱ्यांनी कधीही तक्रार वा कुरकुर केली नाही. उलट दरवर्षी या करार शेतीत भाग घेणाऱ्या शेतकऱ्यांची व क्षेत्राची संख्या वाढतच गेली. हे करार शेतीचे तत्वज्ञान त्यांनी अन्य पिकांसाठीही शेतकऱ्यांमध्ये रूजविले. ही शेती भविष्यकाळात विकासाचा मोठा घटक राहणार आहे. ही भाऊंची दूरदृष्टी खूप



पांढऱ्या कांद्यावर प्रक्रिया

# भवरलालजींची दूरदृष्टी

भविष्यकाळात पाण्याचे वितरण नळ पद्धतीतूनच होणार आहे. नळ निर्मितीमध्ये कमी खर्चात, सांधे कमी असलेले, आतून गुळगुळीत आणि जोडणी पटकन व्हायला पाहिजे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. नळ टाकणे हे मोठे काम आहे. नळाचे (पाईप) नुसते उत्पादन करून उपयोग नाही. नळाने पाणी पुरवठा करणे विचार वेगळा, नळाचे उत्पादन वेगळे आणि नळ प्रणालीचा विस्तार करणे वेगळे. या तीनही स्वतंत्र गोष्टी आहेत. या पाईपातून पाणी वाहून नेण्याच्या प्रणालीचा विस्तार कसा करायचा, त्यासाठी पाईप किती मोठ्या आकाराचे व कसे बनवायचे, ते किती वर्ष टिकतील, ते केव्हां बदलावेत असे अनेक पैलू जे या विषयाच्या मागे आहेत त्याचा भवरलालजींनी खूप बारकाईने विचार केला होता. पाईपांचा आकार, गुणवत्ता, टिकावूपणा, हाताळणी, वाहतुक, जोडणी या गोष्टींचा विचार करताना ज्या जमिनीत हे पाईप घालायचे तिथली माती कशी आहे याचाही त्यांनी विचार केला होता. कारण बराच काळ हे पाईप त्या मातीत राहणार आहेत. शेतीत वापरायचे पाईप निराळे. घरगुती काम, उद्योग धंदे, केमिकल इंडस्ट्री, सांडपाणी यासाठी लागणारे पाईप निराळे. शेती क्षेत्रात भविष्य काळात पाईपांचा वापर जास्त होणार हे त्यांनी फार पूर्वीच ओळखले होते. त्यादृष्टीने त्यांनी पाईपांची निर्मिती केली. त्या दृष्टीने ते विचारात खूप पुढे होते. दूरदृष्टी हाच त्यांचा दुर्मिळ असा मोठा गुण होता. इस्राईलची सगळी शेती नळ क्षेत्रावर उभी आहे आणि भविष्यात भारतातही नळ हा शेतीचा अविभाज्य भाग होणार आहे. हे जाणून काटकसरीने पाणी वापरासाठी नळ पद्धती अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने विकसीत व्हायला पाहिजे हे भवरलालजींच्या खूप अगोदरच लक्षांत आले होते. त्याचा त्यांनी चांगला पाठपुरावा केला आणि दर्जेदार पाईपांची निर्मिती केली.



जैन उद्योग समुहाची विविध प्रकारची पाईप निर्मिती



महत्वाची व मोलाची आहे. त्यांनी अर्थशास्त्र या दृष्टीने या विषयाचा खूप अभ्यास केला होता. मनोमन त्यांना हा विषय खूप पटल्यामुळे त्यांनी त्या दृष्टीने पाऊले टाकली व जगापुढे एक चांगले यशस्वी मॉडेल उभे करून दाखविले. हे भाऊंचे योगदान कधीही कुणाला विसरता येणार नाही. कायद्यापेक्षा प्रेमाने माणूस कसा बांधून त्याचा विश्वास संपादन करावा याचा उत्तम नमुना म्हणून भाऊंच्या या करार शेती मॉडेलचा उल्लेख करावा लागेल.

**प्रश्नः भवरलाल जैन यांच्या योगदानाबद्दल आपण काय सांगाल?**

**चितळे**– राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांचा फार मोठा प्रभाव भवरलालजींवर होता. किंबहुना आयुष्यभर त्यांनी गांधी विचारांचाच जप, पाठपुरावा आणि स्वीकारही केला. यादृष्टीने त्यांनी गांधींचे 'विकेंद्रीकरणाचे' तत्व स्वीकारून ते स्वतः प्रत्यक्ष कृतीत उतरविले. पुणे, मुंबई यांसारख्या विकसीत झालेल्या व सर्व सोयीसुविधा उपलब्ध असलेल्या शहरांमध्ये आपले उद्योगधंदे उभे न करता त्यांनी जळगाव सारख्या ग्रामीण भागात ५०–६० वर्षांपूर्वी आपल्या उद्योगाचे जाळे उभारायला प्रारंभ केला आणि सगळा व्यवसाय खेडोपाडी उभे करून तिथल्या शेतकऱ्यांशी नाते जोडले. आपल्या ग्रामीण विकासात विकेंद्रीकरणाचा विषय हा खूप गाभ्याचा व कळीचा आहे. बहुतेक उद्योगपतींना व्यवसायासाठी शहरांचे आकर्षण असते. परंतु भाऊंना कधीच शहरांचे आकर्षण नव्हते. यादृष्टीने जालन्यातील महिको कंपनीचे संस्थापक डॉ. बारवाले यांचेही मला कौतुक वाटते. भवरलालजी आणि बारवाले हे दोघेही यादृष्टीने समविचारी लोक आहेत. दोघांनीही व्यवस्थेतल्या कच्च्या गोष्टी शोधून काढल्या व त्यांची भरपाई करणारे व्यवसाय ग्रामीण भागात सुरू केले. भवरलालजींनी प्रक्रिया उद्योग तर बारवाले यांनी उत्कृष्ट दर्जाची बियाणे शेतकऱ्यांना पुरविण्याचा उद्योग करून शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठी मोठा हातभार लावला आहे. भवरलालजींनी जळगाव जिल्ह्याला खूप मोठे करून त्याचे नाव जगाच्या नकाशावर पोहचविले. ते स्वतः विकसीत जिल्ह्यांच्या दिशेने धावले नाहीत. उलट त्यांनी स्वतःच्या कर्तबगारीवर जगातील विकसीत राष्ट्रातील व भारतातील तज्ज्ञ लोक जळगावात ओढून आणले. त्यांच्या ज्ञान व अभ्यासाचा उपयोग करून स्थानिक जनतेचा विकास घडवून आणला. प्रस्थापित व्यवस्थेला चिटकून राहण्याची त्यांची वृत्ती व स्वभाव नव्हता. भाऊंनी शून्यातून स्वतः नवी व्यवस्था उभी केली. यशस्वी उद्योगासाठी आवश्यक असणाऱ्या विक्री व्यवस्था, बाजार व्यवस्था, संशोधन, तंत्रनिर्मिती, कुशल कामगार वर्गाची निर्मिती या सर्व व्यवस्था त्यांनी स्वतः जळगावात निर्माण केल्या. प्रस्थापित व्यवस्थेवर ते अजिबात अवलंबून राहिले नाहीत. स्वतः व्यवस्था उभी करायला एक धमक व आत्मविश्वास लागतो. तो त्यांनी धैर्याने दाखविला.


महात्मा गांधीजींच्या विश्वस्त जीवनमूल्याचा दृढ संस्कार

भाऊंचा लोकसंग्रह प्रचंड होता. अनेक लोकांना ते जवळचे वाटायचे. त्यामुळे त्यांचा सल्ला घेण्यासाठीही पुष्कळांची गर्दी होत असे. ते खूप वाचायचे. अनेक विषयांचा अभ्यास करायचे. कोणताही विषय त्यांना वर्ज्य नव्हता. त्यामुळे व्यापक ज्ञान होते. एका विषयाला किती विविध अंगे आहेत ते त्यांच्या चटकन लक्षांत येऊन ते समर्थपणे त्याची उकल करून सांगत. त्यांचा विचार एकांगी कधीच नव्हता. मूलभूत विचारांची पक्की बैठक होती. मुलांना चांगले शिक्षण कसे देता येईल याचा ध्यास त्यांनी आयुष्यभर बाळगला. समाजाची मुले ही आपली मुले मानली. त्यामुळे त्यांच्या विचारात व्यापकता होती. मनाने ते विशाल होते. संकुचित विचार त्यांनी कधीही केला नाही. स्वतः चे वेगळेपण कधी दाखविले नाही. सगळ्यात मिळून मिसळून राहायला त्यांना खूप आवडे. प्रकृती चांगली नसतानाही ते सिंचन आयोगाच्या बैठकांना यायचे. तेव्हा मी त्यांना म्हणत असे, तुम्ही वेगळे आला तरी चालेल. पण ते ऐकत नसत. सगळ्यांच्या बरोबर राहण्याचा व एकत्र काम करण्याचा दुर्मिळ गुण त्यांच्या ठायी वसला होता.


**प्रश्नः भाऊंची एखादी विशेष कौटुंबिक आठवण सांगता येईल का?**

**चितळे**– जवळीक किती सांभाळावी याचे एक उदाहरण सांगतो. माझा मुलगा हर्षवर्धन याच्या लग्नाला भाऊ आले होते. सगळ्यांच्या जेवणावळी झाल्या. भाऊ जेवले नव्हते. शेवटच्या आमच्या सर्व भावंडांच्या पंक्तीला जेवायला बसायचे म्हणून ते आग्रहाने थांबले होते. सर्वात शेवटी आमच्या बरोबर ते जेवले. गोष्ट अगदी लहान आहे. पण त्यातून जी आत्मियता व्यक्त होते ती अनमोल आहे. मी तुम्हा भावंडांच्या बरोबरच जेवणार हा आग्रह बरेच काही सांगून जाणारा व नाती कशी सांभाळावीत हे शिकविणारा आहे. लग्न समारंभात भाऊ निमंत्रितासारखे औपचारिक वागले नाहीत. वैयक्तिक संबंधातला घट्टपणा कसा मजबूत करावा हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे होते.

भवरलालजी अत्यंत टापटीप आणि स्वच्छ राहायचे. नेहमी पांढरे शुभ्र कपडेच ते परिधान करायचे. याबाबतीत त्यांची तुलना महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अब्दुल रहमान अंतुले यांच्याशी करता येईल. राजकारण कसेही असले तरी अंतुले साहेबांशी माझी फार जवळीक होती. ते मला नेहमी म्हणायचे, ''अहो चितळे, माझे खरे नाव अंतू लेले आहे हो. तीन पिढ्यांपूर्वी आम्ही लेलेच होतो.''

# विज्ञानाची कास हा भाऊंचा अखंड ध्यास

शेतीच्या प्रत्येक कामात मानवीमन, ज्ञान आणि विज्ञान या तीनही गोष्टींचा महत्त्वाचा सहभाग आहे. त्यामुळे या तिनही विषयांची कास धरून परिपूर्ण अभ्यास व तदनुषंगिक कृती केल्याशिवाय आपण अंतिम लक्ष्यापर्यंत पोहचू शकत नाही याची अचूक जाणिव भवरलालजींना झाली होती. त्यामुळे त्यांनी प्रत्येक गोष्टीतला विज्ञानाचा सहभाग नेमका कसा, कोणत्या स्वरूपात व किती प्रमाणात आहे हे बारकाईने अभ्यास करून समजून घेतले व त्याप्रमाणे आपल्या कार्याची उभारणी केली. उदा. शेतकऱ्याचा कांदा परदेशात प्रक्रिया होऊन निर्यात करायचा असेल तर शेतकऱ्याने जास्त टीएसएस (एकूण साररूप घनभाग) असलेला व पाणी कमी असलेला कांदा लावला पाहिजे. त्याला हंगामनिहाय कांद्याचे बी उपलब्ध करून दिले पाहिजे. व्हरायटींवर संशोधन करून नवनवीन जाती तयार करणे व शेतकऱ्यांकडून नियमित मालाचा पुरवठा होत राहणे याकडे लक्ष द्यावे लागते. ही कामे विज्ञानाच्याच मदतीने करावी लागतात. एवढेच नव्हे तर शेतकऱ्यातून प्रक्रियेसाठी आलेला पांढरा कांदा वातानुकूलीत शीतगृहात कसा साठविला पाहिजे, तो किती अंश तपमानात ठेवला पाहिजे, त्याची प्रतवारी यांत्रिक पद्धतीने कशी केली पाहिजे, तो नासू नये म्हणून यंत्राच्या सहाय्याने हवा केव्हां व किती सोडली पाहिजे यांसारख्या गोष्टींचा विचार केला होता. किंवा केळी व आंब्यावर प्रक्रिया करण्यापूर्वी ती कशी पिकवावीत, किती डीग्रीला प्रिकूल करावा, प्रक्रिया केल्यानंतर तयार झालेला पल्प वा प्युरी हवाबंद डब्यात किंवा बॅरेलमध्ये कसा साठवावा, तो एक-दोन वर्षे टिकवायचा असेल तर किती अंश तापमानात ठेवावा, कोणतेही प्रिझर्व्हेटीव्ह त्यात न घालता नैसर्गिकरीत्या तो कसा टिकविता येईल हे सर्व शास्त्र समजून घेऊन ते वापरण्याचा प्रयत्न केला. टिश्यूकल्चर पद्धतीने ग्रँडनैन केळीची रोपे तयार करताना किंवा अमेरिका-ब्राझील येथून आणलेल्या व्हॅलेंशिया, नटाल, पेरा, हॅमलिन व वेस्टीन जातीच्या मोसंबीची आपल्या हवामानाला अनुकूल होतील अशा पद्धतीने ग्रीनहाऊसमध्ये टिश्यूकल्चरने तयार केलेली रोपे वाढविताना विज्ञानाचा तंतोतंत वापर झालेला दिसतो.



विश्वात ज्ञानविज्ञान हा नेहमीच कुतूहलाचा विषय राहिला आहे. कुठल्याही गोष्टीत इच्छा झाल्याशिवाय ती गोष्ट सफल होत नाही. ज्ञानविज्ञान योग म्हणजे विज्ञानासह ज्ञान प्राप्त करून घेणे. ज्ञान नुसत्या विचारांनी प्राप्त होत नाही. ज्ञानाचा परमतत्वाची आंतरिक अनुभूती लागते. ही अनुभूती कर्मयोगाने प्राप्त होते. निश्चित केलेले ध्येय प्रत्यक्ष पार पाडताना जी कर्तव्यकर्म करावी लागतात तेव्हा ज्ञानविज्ञानाचे प्रयोजन कळते. अशावेळी आपल्या कामात कर्तृत्वाचा अहंकार असता कामा नये याची जाणीव संत ज्ञानदेवांनी देखील करून दिली आहे. यासाठी ज्ञानदेवांनी ज्ञानाला नामाची आणि विज्ञानाला उपासनेची जोड दिली आहे. नामसाधनेने ज्ञान शुद्ध होते. उपासनेने विज्ञान विधायक होते. दोघांना स्व तपासावा लागतो. भाऊ स्वतःचा स्व सतत तपासून धुवून पुसून स्वच्छ ठेवीत. त्यांचे बाह्यरूप आणि अंर्तरूप दोन्हीही पांढरे शुभ्र होते. ज्ञानमय अवस्था जर अनुभवायची असेल तर प्रकृती जाणून घेणे महत्त्वाचे आहे. प्रकृती जाणणे म्हणजे विज्ञान. प्रकृतिला जिज्ञासेतून सत्वस्थ करणे म्हणजे ज्ञान. प्रकृती ही नेहमी परिवर्तनशील असते. ती अव्यक्तातून व्यक्त होते. सुरुवातीला ती बीजाच्या रूपात असते. आणि नंतर तिचा विराट वटवृक्ष होतो. भाऊंनी आयुष्यभर जी कामाची दिशा ठेवली त्याचा फायदा शेतकऱ्याला नेमका काय झाला असा प्रश्न जर आपण विचारला तर शेतकरी खुलेपणाने सांगतो - आमचा आर्थिक विकास झाला. श्रीमंती आली. घरंदारं उभारून झाली. मुलाबाळांचे व्यवस्थित शिक्षण चालू आहे. ती बाहेरगावी, परदेशात चांगल्या शाळा-कॉलेजात शिकताहेत. घरापुढे एक-दोन गाड्या उभ्या आहेत. राहणीमान सुधारले आहे. पाण्याची बचत होऊन अधिक क्षेत्र भिजवू लागलो आहे. नवीन शेती वाढविली आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात झालेला हा आमूलाग्र बदल व स्थिरता ही त्या वटवृक्षाचीच एक फांदी आहे. भाऊंच्या कार्याचा आज जो वटवृक्ष झालेला दिसतो त्यामागची ज्ञानविज्ञानाची ही पार्श्वभूमी आपण नीट समजून घेतली तर प्रवासाची दिशा व विचारांमागील तत्वज्ञान याचा नेमका बोध होऊ शकतो. मनाचा आणि बुद्धीचा एखादा कंगोरा जरी लक्षात आला, तरी ज्ञानविज्ञानाला खूप आनंद वाटतो. मन ओळखणे, बुद्धी तपासणे हे ज्ञानविज्ञानाचे काम आहे. विज्ञान नित्यनूतन होत असते. त्यात संशोधनाने, कामाने नवनवीन भर पडत असते. काळानुरूप बदलणे हाच विज्ञानाचा स्वीकार असतो. शेतीकामासाठी पाहिजे तेव्हां मजूर उपलब्ध होत नाही, मजुरीचा खर्च वाढतो आहे हे लक्षात आल्याबरोबर भाऊंनी कांदा पेरणी यंत्र, ऊस लागण यंत्र, कोरडवाहू शेतीचे नवे तंत्र, अतिसघन व सघन लागवड पद्धती, पीकपद्धती यात विज्ञानाच्या आधारावर आमूलाग्र बदल घडवून आणले. निर्यात व प्रक्रियेसाठी केळी, कांदा यांच्या जाती आपल्या देशात उपलब्ध नव्हत्या. त्या बाहेरून आणून विकसीत केल्या. विज्ञानाची कास हा भाऊंचा अखंड ध्यास होता आणि शेतकऱ्यांवरचा विश्वास हा न्यास होता.



# भाऊ, ज्ञान व विवेकाचा सागर

ज्ञानाशिवाय माणसाची प्रगती नाही हे भाऊंना लहानपणापासूनच मनोमन पटल्यामुळे आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत ते ज्ञानव्रती राहिले. ज्ञानाचे अमृतकण गोळा करीत राहून हे ज्ञान समाजाच्या प्रगती व विकासासाठी वापरत राहिले. स्वतःसाठी ज्ञान मिळविणारी आणि त्या ज्ञानाचा अहंपणा मिरविणारी असंख्य माणसे आपल्याला जगात पहायला मिळतील. पण ज्ञान लोकांच्या कल्याणासाठी खर्ची घालणारे फार थोडे लोक आहेत. त्यात भवरलाल जैन यांचा समावेश आहे. १९६३ साली डेप्युटी कलेक्टरची परीक्षा पास होऊन नागपूरला पोस्टींग मिळालेल्या भाऊंनी सरकारी नोकरीचा स्वीकार न करता सर्वसामान्य जनता जनार्दनाची व जगाचा पोशिंदा जो शेतकरी आहे त्याची सेवा मनोभावे व निरपेक्ष वृत्तीने अखंडपणे करण्याचे व्रत स्वीकारले. कोणतेही व्रत कठीणच असते. ते पूर्णत्वाला नेण्यासाठी कठोर तपश्चर्या आणि दृढ निर्धार व निश्चय तर लागतोच पण वाट चालत असताना रस्त्यात जे काटेकुटे येतात ते दूर करण्यासाठी धैर्य लागते. हे धैर्य ज्ञानाने, अभ्यासाने प्राप्त होते. त्यामुळे ज्ञानाची साधना करणाराच आपल्या अंतिम ध्येय व उद्दिष्टापर्यंत पोहचू शकतो. ज्ञानाचा व्यासंग धरून भाऊंनी नवविचार दिला. विचाराला कृतीचे कोंदण दिले. तो विचार म्हणजे काम्य कर्माच्या त्यागाला संन्यास म्हणतात. कर्माचे फळ सांडून कर्म करणे याला त्याग म्हणतात. सर्वांचे अंतःकरण जाणणे याला वैराग्य म्हणतात. सात्विक, राजस आणि तामस या तीन गुणांनी माणूस घडतो. या त्रिगुणांना मनाने समजून घ्यावे लागते. मनाची समज इथे महत्त्वाची आहे. ती भाऊंच्यात ओतप्रोत भरलेली होती. ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान ही त्रिपुटी कर्माचे कारण आहे. परंतु, कर्ता हा महत्त्वाचीआहे. तो आत्मस्वरूपाकडे जात असतो. इथे पोहोचायला विवेक लागतो. हा विवेक जिज्ञासा, अभ्यास, सत्संग, बंधुता, गुरूकृपा यातून निर्माण होतो. भाऊ हे तर विवेकाचे सागर होते. त्यामुळेच ते एवढी महान सत्कर्मे करू शकले.





# नाळ जोडली शेतकऱ्यांशी

आनंद गुप्ते

''इतकं सुंदर, इतकं जवळ, पाठीशीच असणारं ऑफीस सोडून तुम्ही इथं या जंगली बदामाच्या झाडाखाली कां बसता?'' मी विचारले.

''अरे, अगदी साधी गोष्ट आहे. मी त्या भल्यामोठ्या एसी ऑफीसमध्ये बसलो की सर्व प्रकार एका बुलंद किल्ल्यात बसल्याप्रमाणं होत राहतो. या कारखान्यातला सामान्य सहकारीही तिथं आत यायला बिचकतो. अशानं त्यांच्या अडचणी दूर कशा होणार? इथं, या झाडाखाली कसलाच आडपडदा नाही. कळलं?'' भाऊ म्हणाले.

हे मात्र अगदी खरं. ते मी तर प्रत्यक्षच अनुभवलं होतं कित्येकदा. परवाचीच गोष्ट, नेहमीप्रमाणे भाऊंचं बस्तान होतं त्यांच झाडाखाली वेळ दुपारी १-२ ची. उन रणरणत होतं. तेवढ्यात एक मजूर वाटणारा माणूस तिथं आला अन् हात मुडपून, खाली मान घालून गप उभा राहिला. जरा वेळानं भाऊंचं लक्ष गेलं त्याच्याकडं. ''हं, कोण तूं? काय काम काढलयस?'' भाऊंनी विचारलं. ''पाणी'' तो फक्त एकच शब्द बोलला. ''काय म्हणालास?'' भाऊ परत विचारते झाले. ''पाणी'' तो परत तेच. भाऊंनी त्यांच्या शिपायाला हाक मारली, पिंजारी, अरे याला ती पाण्याची बाटली दे रे.'' पिंजारी हातात बिसलेरी बाटली घेऊन आला व त्याने ती बाटली त्याला दिली. क्षणार्धात त्याने ती तोंडात रिकामी केली. पिंजारीला परत दिली आणि तो परत फिरला. तेवढ्यात त्याला भाऊंनी हाक मारली, ''अरे, इकडे ये. तू कोण? कुठं आणि काय काम करतोस?'' त्यानं सांगितलं, 'हे काम समोरच खोदकाम चाललंय तिथं म्या रोजंदारीवर हाये.'' भाऊ म्हणाले 'अस्सं होय? जा मग कामावर!''

भाऊंनी पिंजारीला बोलावलं आणि सांगितलं, ''अरे ह्या समोरच्या कामाची जबाबदारी असलेल्या आपल्या कंपनीच्या सिव्हिल इंजिनियरला आत्ताच्या आता अर्जंटली घेऊन ये. जा.'' पिंजारी गेला-पांचच मिनिटात तो त्याला पुढं घालूनच घेऊन आला. थांबला. भाऊ त्याला म्हणाले, ''हे काम तुझ्याच सुपरव्हिजन खाली चाललंय नां?'' तो म्हणाला 'हो!' थोड्या वेळाने भाऊ त्याला म्हणाले, ''तुझं जेवण झालंय कां?'' तो म्हणाला 'नाही




भाऊ.' मग काय डबा आणलास कां?'' ''हो, आणलाय.'' ''मग तो घेऊन ये इथंच लॉनवर सावलीत बसून शांतपणानं डबा खा,'' भाऊंनी त्याला सांगितलं. व ते स्वत: दुसऱ्या कामात गढून गेले. त्यानं शांतपणे डबा संपवला. झाकण लावून पिशवीत टाकला आणि उठू लागला तोच त्याला पिंजारीने, खांदा दाबून जमिनीवर जबरदस्तीने बसवला. तो पुन्हा उठू लागला. पुन्हा पिंजारीनं त्याला जबरदस्तीनं बसवला. मग मात्र तो चिडला. तो जोरात म्हणाला, 'अहो भाऊ हा पिंजारी पाणी प्यायला उठू देत नाही. सांगा ना त्याला?' ''भाऊ म्हणाले, 'पाणी कशाला हवं?'' म्हणजे काय? जेवल्यावर पाणी नको प्यायला?''

''अस्सं होय? मग पाण्याची तहान काय फक्त तुलाच लागते कां रे? तुझ्याकडं काम करणाऱ्या मजुरांना तहान लागतच नाही का? तो बघ तो मजूर माझं पाणी पिऊन गेला. करणार काय?'' भाऊ म्हणाले.

''आपण काय करणार?'' तो इंजिनीयर म्हणाला.

''आपण? ऐक, आज, आजच संध्याकाळी पाच वाजता याच भागात एका प्यायच्या पाण्याच्या परमनंट नळाचं उद्घाटन त्याच्याच हस्ते करायचं. मी ही हजर राहणार. तू ही जा लगेच कामाला लाग!'' भाऊ.

उद्घाटन झालं हे सांगायलाच नको. पिण्याच्या पाण्याची तक्रार त्यानंतर एकदाही आली नाही.

इतके साधेसुधे प्रश्न थेट सोडवण्याची भाऊंची युक्ती कोणती? तर बदामाच्या झाडाखाली खुर्ची टाकून बसण्याची–साधे सोपे उत्तर. हा साधेपणा त्यांच्या रक्तातच होता. त्यांच्या सर्व उत्पादनांचा सेवांचा ग्राहक होता एक साधासुधा शेतकरी. त्याही पुढची गोष्ट म्हणजे भाऊ. स्वत:च एक शेतकरी होते. म्हणून त्यांना शेतकऱ्यांच्या अडचणी, दु:ख लगेच कळत. त्यावरचा गावठी उपायही त्यांना ठाऊक असे. शेतकऱ्याची गावठी बोली, उच्चार त्यांना समजत. शेतकऱ्यांबद्दल त्यांना खरोखरी प्रेम, आत्मियता वाटत असे.

जळगावच्या सुभाष चौकातलं त्यांचं पहिलं दुकान 'जे बी' म्हणजे जैन ब्रदर्स या नावानं चाले. आजही चालतं. तिथूनच पाईप्स, फिटींग्ज, ड्रिप, ड्रिपर्स, वगैरे माल विकला जाई. फुटकळ–सुट्ट्या गरजांसाठी शेतकरी वर्ग या दुकानी येतो. एकदा भाऊंनी मनावर घेतलं आणि ते दुकान पूर्णपणे एसी करून टाकलं. एवढंच नाही तर तिथं संच खरेदीस येणाऱ्या शेतकऱ्यांना शांतपणे मऊमऊ सोफ्यावर बसून झक्कपणे हातात गारेगार थंड शीतपेयाची बाटली स्ट्रॉ टाकून मिळत असे. 'असं का?' असं विचारल्यावर भाऊ म्हणाले, 'शेतकऱ्याला अशी ट्रीटमेंट सहसा कोणताही दुकानदार देत नाही. पण शेतकऱ्यांच्या मनाच्या कोपऱ्यात ती इच्छा, आकांक्षा असतेच. मी ती पूर्ण केल्यावर त्याचा इगो सुखावतो व म्हणतो, 'लई भारी राव!''

केवळ 'लई भारी' साठी शेतकरी हमखास या दुकानी येत. एके वर्षी शेतात टोमॅटोचं पीक काढल्यावर प्रचंड पैसा आला. रू.१००/–


शेतकऱ्यांना ट्रॅक्टरचे वितरण करताना कंपनीचे अधिकारी व भवरलाल जैन



ठिबकच्या नळीने केलेले सिंचन

प्रती किलो दरानं त्याचा टोमॅटो मुंबईच्या बाजारात गेला. त्याला या गोष्टीचा इतका आनंद झाला की त्यानं थेट जळगाव गाठलं आणि भाऊंना कृतज्ञतेची पावतीच होती. भाऊंनी जसं शेतकऱ्यांवर प्रेम केलं तसंच त्यांनीही भाऊंवर अफाट प्रेम केलं. परतफेड केली.

खान्देशातील पाचोऱ्या जवळचा एक शेतकरी. त्यांनं शेतात केळी टिश्यूकल्चर रोपं लावली. त्याची अथक मशागत केली. काळजी घेतली. त्याला त्या वर्षी चौपट पीक म्हणून चौपट पैसे मिळाले. त्यानं त्याच पैशातून गावात दुमजली छान कॉंक्रीटचं घर बांधलं. त्या घराचे उद्घाटन करायला भाऊंना बोलावलं. भाऊ तेव्हा कामात फार व्यस्त होते. म्हणून भाऊ त्याला आशिर्वाद देत झाले व स्वत:ची असमर्थता व्यक्त केली. त्यावर अत्यंत शांतपणे पण निश्चयाने तो म्हणाला, ''भाऊ, हरकत नाही. मी थांबतो, भले एखाद वर्ष जरी लागलं तरी हरकत नाही. पण तुम्ही त्या घराचं उद्घाटन केल्या शिवाय मी गृहप्रवेशच करणार नाही!'' बोलणंच खुटलं. भाऊ सर्व कामं बाजूला ठेऊन पाचोऱ्याला गेले. जावंच लागलं.

अशी कितीतरी उदाहरणे घडली. अगदी सहाजिकच सरळपणे शेती, शेतकरी व शेतीतले तंत्र यावर त्यांची खरी निष्ठा होती. त्यामुळे ते सतत नाविन्याचा शोध घेऊन विज्ञानाचा वापर करीत नवनवीन शोध लावित राहिले. परंपरागत मोटेने पाणी देण्याच्या पद्धतीला पर्याय म्हणून विद्युत पंप आले. तेव्हा पंपातले पाणी वाहून नेण्यासाठी भाऊंनी पाईप विकसित केला. त्यानंतर काटकसरीने पाण्याचा वापर होऊन बचत व्हावी म्हणून ठिबक-तुषार सिंचनाचे तंत्रज्ञान भारतात आणले. एवढ्यावरच ते थांबले नाहीत. यातले पुढचे संशोधन म्हणून इनलाईन, सबसरफेस, रेनगन, वेगवेगळ्या प्रकारचे व्हॉल्व, ड्रीपर्स, ॲटोमेशन असे तंत्र विकसीत करीत राहिले. पाण्याच्या वापरातले तंत्रज्ञान जसे महत्त्वाचे आहे तसे प्रक्रिया, सौर उर्जा, कृषि पंप, कचऱ्यातून वीजनिर्मिती, उतीसंवर्धन पद्धतीने रोपांची निर्मिती, व्हायरस व रोगमुक्त रोपवाटिका, बी बियाण्यांचे सुधारित वाण, प्रक्रियानुरूप वाणांची निर्मिती अशा एका ना अनेक गोष्टींच्या निर्मितीसाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यासाठी अभ्यास केला. जाणकार शास्त्रज्ञांशी चर्चा केली. भाऊ स्वत: दूरदृष्टीचे शास्त्रज्ञ होते. त्यामुळे आयुष्यभर ते विज्ञानाची पूजा मनोभावे करीत राहिले. त्याचाच त्यांना परतावा मिळाला. जन्मभर जन्मोजन्मी. अगदी पुढच्या पिढ्यांनाही. अविरत.



झाडाला बसविलेल्या ठिबक संचासंबंधी चर्चा करताना भवरलाल जैन आणि डी. पावलो

# ठिबक युगाचा शालिवाहन

उजाळिले तू तनमय जीवन
ठिबक युगाचा शालिवाहन
ऋषी–कृषिस्तव झिजले कणकण
तेच खरोखर विजयी जीवन।।

कर्म–ध्येय हेच होते जीवन
जीवन म्हणजेच कर्मे सिंचन
न थांबता ना विचलित होऊन
कर्तव्यात दवडले अखेरचे दिन
तेच खरोखर विजयी जीवन।।


विज्ञानाचा पाईक असुनी
देश–देव–धर्मा रोज स्मरूनी
काळी माती मायबापा ब्रह्म मानुनी
मी चे श्रेय । तिला देऊनी
नारीशक्तीचा घोष क्षणोक्षण
तेच खरोखर विजयी जीवन।।

शेती, पाणी, पुस्तकमळा,
ज्ञानमळा अन् प्रयोगशाळा
झाड, फुले, पशू अन् पक्षी,
किडा, मुंगीत प्रेमजिव्हाळा
अचूकतेचे कल्पकतेचे,
आरोग्याचे अनुभूतीचे
नवतंत्राचे संस्काराचे,
शिस्त आणि उत्तमतेचे
जलयज्ञातून पूर्ण समर्पण
तेच खरोखर विजयी जीवन।।

सत्य अहिंसा शिव सुंदरता
राम–रहिमची गमे ऐकता
साधी राहणी उंच आचारसरणी
गांधी युगाचे घडवी दर्शन
तेच खरोखर विजयी जीवन।।

शेतीसाठी पाणी आटले
डोळ्यांमधुनी पूर दाटलें
बळीराजा तू नकोस हारू
आणि स्वत ला नकोस मारू
नव्या दिशेने चल शेत सावरू
सांगे हिताचा मार्ग मनोमन
तेच खरोखर विजयी जीवन।।

**– एस. पी. कुलकर्णी**
मु. कामोठे, नवी मुंबई





# पत्नीचे चरित्र लिहिणारा पहिला उद्योगपती

## बापूसाहेब पुजारी

वर्ष १९९७ चालू होते. श्री. मनोहर जोशी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते, त्या काळात ''महाराष्ट्राची पाणी टंचाई'' हा विषय सातत्याने चर्चेत येत होता. विशेषतः विधानसभेत ''पाणी आणि महाराष्ट्र'' याच विषयावर प्रश्नोत्तरे झडत होती. मुख्यमंत्र्यानी एक निर्णय घेतला अ) महाराष्ट्राची मानवी जीवनासाठी पाण्याची गरज किती? ब) दुधासाठी गोठ्यात सांभाळल्या जाणाऱ्या गायी, म्हशी, बैलजोड्या यांची पाण्याची गरज किती? क) शेती व्यवसाय व इतर उद्योगधंदे यांची पाण्याची गरज किती? ड) आणि प्रतिवर्ष महाराष्ट्राला उपलब्ध होणारे पाणी किती? थोडक्यात महाराष्ट्रातील उपलब्ध होणाऱ्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा हिशोब लावण्यासाठी मुख्यमंत्री श्री मनोहर जोशी यांनी सरकारच्या वतीने महाराष्ट्र व जलसिंचन आयोग नियुक्त केला. जल आयोगाचे अध्यक्ष होते जागतिक किर्तीचे जलतज्ञ श्री. माधवराव चितळे. या जल आयोगाचे सदस्यांमध्ये श्री. भवरलालजी जैन व श्री. बापूसाहेब पुजारी हे दोघेही सदस्य होते.

श्री. भवरलालजी व त्यांचा जैन उद्योगसमुह यांचा व माझा पुर्वीचा कोणताच भेटीचा प्रसंग आलेला नव्हता. संपर्क यावा असे कोणते कारणही नव्हते. परंतु योगायोग म्हणण्यापेक्षा नियतीने म्हणजे महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने आमच्या दोघांचा ऋणानुबंध घडवून आणला. कारण आम्ही दोघेही महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाचे सदस्य होतो. आयोगाचे मुख्य कार्यालय महाराष्ट्र सरकारने औरंगाबाद येथे वाल्मी या विश्रामधामामध्ये. निवास व विचार विनीमयासाठी कार्यालय व सभागृह उपलब्ध करून दिले होते. प्रत्येक महिन्याचे पहिले ५ दिवस अशा सुमारे दोन वर्ष आमच्या तेथे बैठका होत असत. औरंगाबाद मधील वास्तव्यामुळे माझा व भवरलालजी यांचा परिचय झाला व आम्ही जिव्हाळ्याचे मित्र झालो.

सिंचन आयोगाचे अध्यक्ष श्री. माधवराव चितळे यांनी असा एक निर्णय घेतला कि ''पाणी'' हा विषय केवळ शेतीला नव्हे तर सर्व मानवी जीवनाला व्यापून राहिला आहे. त्यामुळे सिंचन आयोगाने, सामान्य माणसाचे म्हणणे ऐकण्यासाठी महाराष्ट्रामध्ये विभागवार बैठका घ्याव्यात. त्यामध्ये मराठवाडा विभागासाठी बीडमध्ये ५ दिवस व कोकण धरून दक्षिण महाराष्ट्रासाठी सांगली येथे एक आठवडा सिंचन आयोगाच्या बैठका झाल्या.




कोरडवाहू शेती व पाणी, ओलिताखालील शेती, फळबाग आणि शेती व उद्योग आणि पाणी अशा सर्व विषयात श्री. भवरलालजी यांचा अभ्यास होता विशेषतः दररोज रात्री भोजन झाल्यावर जल आयोग बैठकीपुढे कोणता विषय चर्चेला आहे व ते लक्षात घेऊन चर्चेसाठी टिप्पण करीत असत. माझाही बराच अभ्यास असल्याने बैठकीपूर्वी आम्ही दोघेजण टिप्पणीवर चर्चा करीत असू. अशा चर्चेतून आमचा एकमेकात जिव्हाळा निर्माण झाला.

जल आयोगाच्या कालखंडात मी सांगली अर्बन को. ऑप बँकेचा चेअरमन होतो. मराठवाड्यातील आयोगाची बैठक बीड येथे आमच्या बँकेमध्ये घेण्यात आली. सर्व सदस्यांचा निवास व बैठक घेण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था बँकेच्या विस्तृत इमारतीमध्येच होती. एकत्रित राहणे, वागणे, बोलणी यामुळे श्री. भवरलालजी व माझा आणखी जिव्हाळा वाढला. अशीच एक आठवड्याभराची बैठक सांगली येथे आमच्या बँकेच्या सभागृहात घेण्यात आली. या सर्व बैठकीला श्री. भवरलालजी आग्रहपुर्वक उपस्थित असत, चर्चेच्यावेळी आम्ही दोघे ठरवून प्रश्नोत्तरे करीत असू. सांगलीच्या बैठकीला सांगली खेरीज सोलापूर, कोल्हापूर, सातारा, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्याचे प्रतिनिधीही बोलावले होते. श्री. भवरलालजी या सर्व जिल्ह्यांच्या पाणी प्रश्नाची माहिती घेण्यात आघाडीवर होते. सांगली बैठक श्री. भवरलालजींच्या दृष्टीने आणखी एक महत्वाचा प्रसंग झाला.

सांगली बैठकीचे हे दिवस आंब्याच्या हंगामाचे होते. महाराष्ट्राच्या सर्व भागातून आयोगाचे प्रतिनिधी येणार. त्यांना हापूस आंबे घरी नेता यावेत म्हणून रत्नागिरीच्या एक आंबे व्यापाऱ्यास आंब्याच्या ५० पेट्या घेवून येण्याचा निरोप दिला होता व तो पेट्या घेऊनही आला होता. कुणी एक, कुणी दोन असे करून ४१ पेट्या खपल्या. श्री. भवरलालजी सर्व उलाढाल बघत बाजूला होते. आंब्याच्या ९ पेट्या शिल्लक होत्या. श्री. भवरलालजी त्या आंबा व्यापाऱ्यास म्हणाले, बाबा ती लालसर रंगाची गाडी माझी आहे. या ९ पेट्या माझ्या गाडीतील डिकीत व मागील सीटवर ठेवून दे. माझा जैन परिवार मोठा आहे. या ९ पेट्या घेतल्या हे तुझे पैसे घे. एकावेळी ९ आंब्याच्या पेट्या घेणारा हा कोण विक्षिप्त माणूस इतर सदस्य त्यांच्याकडे पहात होते आणि श्री. भवरलाल जैन यांनी खुल्या अंत:करणाने सांगितले, माझी पत्नी सौ. कांताबाई हिने आमचा विशाल जैन परिवार सांभाळाला आहे. आमच्या घरात सौ. कांताबाईंचा शब्द प्रमाण मानला जातो. त्यामुळे सर्व परिवारासाठी ९ आंब्याच्या पेट्या घेतल्या आहेत.

भवरलालजी यांचे त्यांच्या पत्नी सौ. कांताबाई यांच्यावर विलक्षण प्रेम होते. त्यांनी आपल्या पत्नीचे ''ती आणि मी'' या नावाने आत्मचरित्र लिहीले आहे. पत्नीचे आत्मचरित्र तीच्या बोली भाषेत लिहणारे श्री. भवरलाल जैन हे भारतातले पहिले पती असावेत.

**पर्यटनाचा सुहास्यासह आनंद!**
**भवरलालजी आणि सौ. कांताबाई**



या चरित्राला अर्पणपत्रिकेत त्यांनी एकच वाक्य लिहिले, ''तीची कहाणी आणि माझी लेखणी'' असा हा जैन उद्योग समुहाचा संस्थापक. त्यांनी जळगांव जवळ हिल्सवर स्थापन केलेल्या उद्योग समुहाचे सानिध्यात आमच्या जलआयोगाच्या दोनवेळा बैठका घेतल्या. आपण व आपले चार पुत्र, त्यांचे उद्योग है वैभव आम्हांला दाखविले पण ते अत्यंत नम्रतेने त्यामध्ये मी हे सर्व केले असा कोणताही अहंकार नव्हता.

ती आणि मी या कांताबाईच्या चरित्रग्रंथाची समाप्ती करताना त्यांनी म्हटले आहे मी, लिहीलेले हे ती चे (सौ. कांताबाईचे) आत्मचरित्र आहे. ज्यांना भावेल त्यांनी अवश्य वाचावे त्यांचा संसार सुखाचा होईल कारण विवाह ही साताजन्माची वाटचाल असते.



# जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे

ना.धों. महानोर

भाऊ, भवरलाल भाऊ, पद्मश्री भवरलाल भाऊ. हे सकलांचे, लहानमोठ्या कुठल्याही माणसांचे जिवलग भाऊ. शेतीबाडी झाडी नदीनाले त्यातलं झुळझुळ गाणं आणि त्या भवतालचे सुंदर पक्षी. अनेक रंगांचे पक्षी फुलपाखरं आणि ढगांनी भरगच्च भरून हळुवार मातीशी मिसळणारं – नवीसृष्टी उभवणारं आख्या जगाला अन्नाचा घास भरवणारं आकाश भुई अशा सकलांशी घट्ट नातं जोडून असलेले भाऊ. एक सौंदर्यवेडा नितळ मनाचा नवी सृष्टी उभारण्याचं नुसतं स्वप्न न पाहता त्यासाठी अहोरात्र आयुष्य ज्यांनी दिलं ते आमचे भाऊ. मित्रांना जपणारे, कुटुंबाचच नव्हे तर त्याच्या परिघातले सगळेच दूरदूरचेही जवळ कवटाळून त्यांच्यासाठी जपलं ते सगळं मनःपूर्वक देणारे सहृदय भाऊ. दुर्जनांच्या नाठाळांच्या विरूद्ध बोलणारे, सज्जनशक्तीचे ते मग कोणीही असो त्यांना आपले आप्त करून पुस्तक लिहिणारे लेखक भाऊ. कितीही लिहिलं तरी ते अपूर्णच वाटावं इतके समृद्ध असे भाऊ. जैन पाईप ठिबक आणि शेतीशी आधारित अनेक पारदर्शी उद्योग करीत असताना कॉक्रींटच्या त्या परिसरात मुख्यतः वेगवेगळ्या सुंदर झाडांना जागा करून आणि म्हणून दहावेळा कागद घेऊन, चर्चा करून सुंदर झाडांची पक्षांची देखणी वास्तू – इंडस्ट्रीज भाऊंनीच उभी करावी. जैन हिल्स मध्ये विशेषतः १९९० नंतर सदतीस एकरांमध्ये व त्यानंतर एक हजार एकरांमध्ये घर – सुंदर घर, पाहुण्यांसाठी घर, गुरूकूल, दगडधोंडे झुळझुळ झरे, फलोद्यान, वनश्री उभी करताना त्याचं सौंदर्यसक्त मन त्यासाठी कितीही पैसा लागो हे मी त्यांच्या सोबत राहून जवळून पाहिले. म्हणून जैन हिल्स लदबदल्या झाडांचे, पक्षांचे पाण्याचे सौंदर्यस्थळ आहे.

हे नुसतं जळगावमध्येच नाहीतर गुजरात, आंध्र, कर्नाटक अशा देशातल्या विविध राज्यात उद्योग उभारणीसोबतच हे निसर्ग सौंदर्य, खूप खर्चाचं पण जिवाभावाचं भाऊंनी उभं केलं. 'जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे' हीच भाऊंची मनोवृत्ती. वाकोदसारख्या

स्वतःच्या जन्मभूमीत ओसाड शेतात – पैशांची पिकं घेण्याचा विचार करतांनाही झरे पाणी विहीरी – सागवानं बांबू इतर झाडं आणि सायंकाळी त्या झाडांच्या घरांवर येणारे विसावा घेणारे एक लाख पक्षी, त्यांची किलबिल यात भाऊंना आनंद होता हे उभारतांना मी मित्र म्हणून त्यांच्या सोबत होतो याचा मला भरभरून आनंद आहे. 'फाय फाउन्डेशन' सारखा अतिशय मोलाचा पुरस्कार भाऊंना मिळाला. इचलकरंजीला त्याचा अतिशय भरगच्च देखणा सोहळा. भाऊ बाई कांताबाई, लहान अथांग, गिमी फराद, सुबीर बोस, डॉ. दोशी, आनंद गुप्ते अशा मित्रांसह भाऊंचा ताफा होता. गौरव पुरस्कार इचलकरंजीत स्वीकारल्यानंतर कोल्हापूरला मुक्काम ठोकला. तिथली उद्योग नगरी भाऊंनी पाहिली. नंतर भाऊंना मी कर्मवीर भाऊराव पाटलांनी इथे पहिल्यांदा रूजविलेली रयत शिक्षणाचा वटवृक्ष त्याची चर्चा केली, शाहू महाराजांचं समाजकार्य, चित्रपट महर्षीचं मोठं योगदान, चित्रशिल्प लेखक या क्षेत्रातले मोठे प्रतिभावंत यांची माहिती दिली. भाऊंनी जेवढं जमेल तेवढं पाहू. त्या लोकांशी बोलू आणि खूप काही ओटीपोटी घेऊन जाऊ म्हणून भाऊ नको तेवढे फिरले. डॉ. डी. वाय. पाटील यांच्या शिक्षण संस्थेलाही भेट दिली. नामदेव, आलोच आहे तर तात्यासाहेब कोरे यांचा साखर कारखाना त्यांनी उभारलेला कृषी उद्योग – नवे प्रयोग आणि तिथल्या मुला–मुलींना गीतसंगीत कला या साठीही दिलेलं योगदान पाहू. त्यांचं गीतसंगीत ऐकू. आपल्याला खरच काही घेता येईल. तिथे दिवस दिला. त्यानंतर बाहुबलीच्या दर्शनाला.

अनेक आपले सवंगडी थकून जात. भाऊ न थकता न थांबता त्या परिसरातलं थेट सांगलीतलं सुद्धा नवं ते पाहून वेडे झाले. श्री. गिमी फराद जवळचा जिवलग कलावंत स्नेही. त्यांच्या माथेरानच्या उंचउंच अशा डोंगर जंगलामध्ये, लहानशी झुकझुक आगीनगाडी, तीन किलोमीटर माती गवत – दगड वाळलेली पानं अशा निबिड रस्त्यानं बंगल्यावर पोचलो. मोठमोठे शाही बंगले, काही सोडून गेलेले, उध्वस्त झालेले, निर्मनुष्य पाहतांना भाऊ उदास झाले. करोडोची संपत्ती इथे टाकलेली शंभर वर्षांपूर्वी आता कुठलीही नवी पिढीइथे येत नाही. कधीकाळी उन्हाळ्यात दोन चार दिवस. त्या बंगल्याच्या भोवती उंच उंच डोंगरातल्या घनदाट झाडीमध्ये – पाल्यापाचोळ्यामध्ये सुंदर निसर्ग सौंदर्याशी आम्ही बोलत कविता गात बसलो.

**हिरवळ आणिक पाणी, तेथे सुचती मजला गाणी**
**निळीतली पाखरे पांढरी किलबिलतात स्वरांनी.**

कविता आणखी कविता – कित्येक कवींच्या भाऊंच्या आग्रहास्तव. भाऊ म्हणाले इतरांच्या इतक्या कविता पाठ म्हणणारा दुसरा कोणी नसणार. मी सागाचं हिरवं भलं मोठं पान भाऊंजवळ ठेवलं आणखी एक अर्धवट हिरवं – पिवळं. पिकलेलं. भाऊ, निरखून पहा. गळालेलं पिकून पिवळं करड्या रंगाचं पान. त्यावर बारीक बारीक काळे ठिपके. बारीक छिद्र मी दाखवीत होतो. नामदेव या हिरव्या पानापेक्षाही गळालेलं म्हातारं पिवळं करडं पान फारच सुंदर,



**आप्पासाहेब पवार पुरस्कार वितरण समारंभात व्यासपीठावर शरद पवार आणि भवरलाल जैन. दोघांचाही जन्मदिवस १२ डिसेंबरच. दोघांनाही शेतीपाणी याच विषयांचा अभ्यास करण्याची आवड. विज्ञानाची कास धरून व शास्त्रीय संशोधनाचा वसा बाळगून नवनिर्मितीकडे दोघांनीही जाणीवपूर्वक लक्ष देऊन शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती व स्वयंपूर्णता महत्वाची मानली हे विशेष. दोघांचेही विचार अगदी मिळते जुळते. हा विलक्षण योगायोगच.**

विलोभनीय आहे. फुलपाखरांचे उडणारे थवे कल्पनाही करतायेत नाही. कोणी ही प्रतिकृती करू शकत नाही अशा पखांची फुल पाखरं. उंच उंच झाडी – उंच निरभ्र सुंदर निळं आकाश. अबोल शांतता भाऊ त्यात विरून गेले. बाईला कांताबाईला बोलवायला सांगितलं. जवळ बसविलं. निस्तब्ध असेही भाऊ.

भाऊ कधी उन्हाळ्यात, कधी मनात आलं त्यावेळी भारतातल्या जिथे काही महत्त्वाचा इतिहास आहे. नवे प्रयोग करणारे प्रतिभावंत असोत की डोळे सुंदर करून टाकणारं सौंदर्यस्थळ असो. कुटुंबातल्यांना, गणगोतातल्या लोकांना, मित्रांना घेऊन जात असत. अरे, उद्योग जन्माला पुरणार आहेच? त्यातून यासाठी बाहेर येणं स्वतःला सजग करून घेणं महत्वाचं! महाबळेश्वराला एकदा तीन–चार दिवस भाऊ तीनशे जिवलग जवळच्या गणगोताला घेऊन होते. तिथे उद्योग व्यापार इतर प्रश्नांची कुठलही चर्चा नको. केवळ आनंदी आनंद. निसर्गात भटकंती, गप्पा, लहान मोठेपण विसरून मुला मुलींचं बायकाचं नृत्य, समुह गाणं आणि मनमुराद धिंगाणा. मुंबईहून काही गायक गायिका बोलाविलेल्या होत्या. त्यांच्या गीतांची मैफल. मध्ये एक गाणं झाल्यावर प्रचंड टाळ्यांच्या कडकडाट. गाणाऱ्यांना माहीतच नव्हतं ते गाणं ज्यांच आहे ते महानोर समोर बसलेले आहेत. भाऊंनी माझ्या गळ्यात हात टाकला. मला जे जमत नाही ते ज्यांच्या जवळ सुंदर आहे ते चित्रकार, शिल्पकार, लेखक, कवी आणखी कोणी कोणी ते मी मनःपूर्वक स्वतःत सामावून घेतो. त्यात मी मला शोधतो. असे लोक मित्र समजून जगातले माझे आहेत. मी भरून पावतो. हा भाऊंची भावना. नव्हे ते तसे अनेकदा बोलत असत. जगातल्या अनेक क्षेत्रातल्या श्रेष्ठ माणसांच्या, देशातल्या माणसांच्या सीडीज् भाऊंनी सकाळचा ब्रेकफास्ट झाल्यावर मला ऐकवलेल्या आहेत. अनेक चित्रफीती दाखविल्या. पुस्तकांचे, त्यातल्या महत्वाच्या भागाची चर्चा अनेकदा केली. असं. नुसता उद्योग नाही तर असा ज्ञानाचा, कलेचा सांस्कृतिक खेळ.



जैनहिल्सवर केलेल्या विविध प्रयोगांची पाहणी करण्यासाठी उद्धव ठाकरे, सुरेश प्रभू, शिवाजीराव देशमुख आले असताना त्यांच्या समवेत भवरलाल जैन, सुरेश जैन आणि अजित जैन



जैनहिल्सचे नयन मनोहारी दृश्य

प्रगत शेतकरी, संशोधक, उद्योग क्षेत्रातील यशस्वी मंडळी समाजकार्यकर्ते, साहित्यिक, कलावंत यांचा भरभक्कम असा राबता जैन हिल्सवर असतो. राजकारणीही येत असतात हे सकलांचे चांगल्या गोष्टींच्या उभारणीचं घर आहे असं भाऊ सांगत असत. माझ्याकडे किंवा जळगाव शहरामध्ये अनेक मोठ्या कार्यक्रमानिमित्त अनेक क्षेत्रातील जाणते मोठे लोक विचारवंत येतच असतात. भाऊ म्हणायचे, नामदेव ही विचारवंत मोठी माणसं त्यांचा त्यांचा विचार असेल. उजवा–डावा असं काही नसतं. उद्योगपती, श्रीमंत असं काही नसतं. आपण त्यातले नाही आहोत. मला त्यांच्या ज्ञानाची विचारांची भूक आहे. त्यांच्याशी मनमोकळी चर्चा करू व आत्मसात करायचे पण काही लोक त्यांना जैन हिल्सवर यायला अटकाव करतात आणि ते तर आले पाहिजेत असे जे परिचयाचे लोक अडलेले अडवलेले मी त्यांच्याशी बोलून व माझ्यावर त्याचं प्रेम असल्यानं घेऊन आलो. अशीही नावांची मोठी यादी आहे इथे कशाला सांगायचे. ते नुसते आले नाहीत नंतर भाऊंचेही आप्त व वेळोवेळी विचारांची शिदोरी देणारे राहिले. भाऊंनी त्यांच्या प्रती नेहमीच आदराचं, प्रेमाचं स्थान ठेवलं. असे मोठ्या उद्योगपतीच्या चौकटी बाहेरचे भाऊ. जे इकडे येऊ शकले नाहीत पण थोर आहेत. कर्नाटकातल्या शेती उद्योगाच्या उभारणीत भाऊ मला घेऊन गेले. कोईम्बतूर शंभर वर्षांचं कृषी विद्यापीठ. तिथे एकदा असताना जगविख्यात कृषीशास्त्रज्ञ पद्मविभूषण स्वामीनाथन यांच्या गावी – घरी गेले. चर्चा केली. 'नामदेव, आपण काहीच नाही. किती ही माणसं ज्ञान संपन्न बघ'.

१९९२ला भाऊ आणखी जैन उद्योग समूहाचे अनेक कर्तेधर्ते इस्राईल देशात जागतिक अॅग्रीटेकसाठी होते. खूप खूप शेतीचं जगभरचं पाहिलं. तिथलं तंत्रशास्त्र नवे प्रयोग ज्ञान एवढंच नाही तर तिथल्या माती पाणी ठिबकसह



अवघं उचलून घेऊन जैन उद्योगाच्या जळगावच्या टेकड्यांवर रूजविलं. असं अनेक देशातलं-जगातलं. भारतात स्नेहबंध जोडले. तसेच पंचवीस तीस देशात. अनेकदा माझ्या अनेक क्षेत्रातल्या (साहित्यकला - विधिमंडळ कौटुंबिक)अडचणी कितीही महत्त्वाच्या आणि मी यायलाच हवं असा आग्रह धरल्यावर मी त्यांच्यासोबत गेलो नाही. ते प्रचंड रागावर असत. त्याचं मी ऐकलं नाही म्हणून 'प्रपंच करावा नेटका मग साधावी परमार्थ घटिका' हे तुकारामाची ओळ मला ज्ञात होती. रागावलेल्या भाऊंचा नंतर महिन्याभरात फोन. पळसखेडला चार-पाच दिवस जळगावी थांबवून घेत. रागावल्याच्या दुप्पट प्रेम पुन्हा माझ्या झोळीत टाकीत असत असे भाऊ. खूप लिहिता येईल मोठं गाठोडं आहे. सगळ्या क्षेत्रातलं ज्ञान आत्मसात कराव म्हणून भाऊ जमिनीवरच राहिले. उद्योगपती, विचारवंत, समाजसेवी म्हणून राज्यातल्या देशातल्या अनेक क्षेत्रातल्या लोकांनी त्यांचा 'पद्मश्री' सह अनेक गौरव देऊन सन्मान केला. तरीही भाऊ स्वतःला 'अणूरेणूया थोकडा' असंच समजत असत. शेती हाच आपला प्राण. माती शेती पाणी शेतकरी यांना बळ दिलं तर देश मोठा होईल. हीच आपली आपल्या परीनं सेवा. हीच चिरंतन सेवा व सत्य आहे. भाऊ आपल्यातून निघून गेले. मुंबईला शेवटचं जाणं. त्याआधी भेटीला बोलविलं. त्यावेळी 'नामदेव, परवा दवाखान्यातून परत येतो, आता तू आणि मी सुंदर शेतीचं व समाजकार्याचं नवं आकाश शोधू: मुलं उद्योग नीट चालवितील. मला चिंता नाही - परवा पुन्हा भेट'. पाच सहा वर्षांपूर्वी तीस एकर माथ्यावरती जमीन घेतली म्हणून भाऊंनी बोलाविलं. त्या जमिनीवर पाय ठेवला. काय करायचं हे ठरविलं. ते किरकोळ होतं. तिथल्या दोनशे वर्षांचं वय असलेल्या वडाच्या एका दगडावर बसून फोटो काढून घेतला. 'नामदेव, काही केलं तरी उद्या 'पाणी' हा प्रश्न उद्योग समूहाला व आपल्या शेतीच्या स्वप्नांना तडा देणार. ही समोरची दरी काळा कातळ युद्ध पातळीवर फोडून काढू. खोल खोल फोडू. पाणी निर्माण करू. आपलं पाणी, आणि तुझ्या माझ्या कल्पनेतील - डोळे सुंदर करणारी वनश्री, फळबागा अनेक फळबागा, पैसा देणारी शेती ही सृष्टी उभी करू. एवढा पैसा - प्रचंड पैसा मी इथे टाकतो. कदाचित न बोलता मुलंही रागावतील पण हे करायचंच. माझ्या गळ्यात हात टाकून हे पक्का असं बोललं. तीन वर्षे भाऊंच्या गाडीत प्रचंड पावसात चिखलात दगडात धोक्याच्या ठिकाणी गाडी फिरवीत राहिलो. चौघा मुलांना भाऊंनी या सृष्टीसाठी वचनबद्ध केलं. शेवटच्या काळातील भाऊ या ध्येयवेड्या तरुणाची ही सृष्टीची दुनिया - स्वर्ग उभा राहिला. त्यांच्या कल्पनेत होता तसाच. 'सुंदरतेच्या सुमनावर दव चुंबुन प्यावे, चैतन्याच्या मुक्त मोकळ्या उन्हात हिंडावे' या बालकवींच्या ओळी साक्षात सृष्टीत वृद्धींगत केल्या. सृष्टी 'भाऊंच्या डोळ्यांनी बलवंत हातांनी उभी केलेली. गेल्या महिन्यात दोन तीन वेळा मी सृष्टीमध्ये भटकलो. निस्सीम आनंद टेकडीवर बसलो. खिन्न, उदास झालो. हे पाहायला आज माझ्या सोबत भाऊ नाहीत. पुन्हा भाऊंना आवडणाऱ्या दोन कविता ओठांवर आल्या- इथल्या सृष्टीच्या लदबदल्या फळ झाडांमध्ये वनश्री व चिवचिवपायाच. यामध्ये नितळ निळ्या शांत पाण्यामध्ये मावळतीचा लालजर्द सूर्य - भाऊंच्या रूपाने पाहिला.



# जगण्याची ग्रेट सहजता

स्वर्गीय भवरलाल जैन यांच्या निधनानंतर एक स्मृतिग्रंथ काढण्याचे ठरले. या ग्रंथासाठी ज्ञानपीठ पारितोषिक विजेते ज्येष्ठ साहित्यीक व थोर विचारवंत डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी २०१७ मध्ये अल्पखानी पण सर्वांग परिपूर्ण अशी प्रस्तावना लिहिली आहे. भाऊंच्या जीवन कार्यावर प्रकाशझोत सोडणाऱ्या या प्रस्तावनेचे काही किरण आपल्यापर्यंत पोहोचावेत म्हणून प्रस्तावना भाऊंच्या जन्मदिनाच्या निमित्ताने 'कृषितीर्थ'च्या अंकात प्रसिद्ध करीत आहोत.

स्व. भवरलाल भाऊ हे अजूनही आपल्यात आहेत. असे वाटायला लावणारा हा स्मृतिग्रंथ आपल्या सर्वांना आवडेल असा झाला आहे. चांगली माणसे गेल्यावरच ती आपल्या जास्त जवळ येतात, असे आध्यात्मिक संवेदन देणारे हे संपादन भाऊंच्या उत्तुंग कर्तृत्त्वाचाही परिचय करून देते. भाऊंसारखे प्रतिभाशाली व्यक्तिमत्त्व किती नानाविध क्षेत्रांवर आपला प्रभाव टाकू शकते, याचेही उद्‌बोधन या ग्रंथात होते.

महात्मा गांधीवरील एका अप्रतीम मृत्युलेखात जॉर्ज आर्वेल ह्या सुप्रसिद्ध लेखकाने असे म्हटले आहे की, 'फार थोडे लोकनेते आपल्यानंतर अशी कमी दुर्गंधी ठेवून जातात'. भवरलालभाऊंनी एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे त्यांना मिळाली त्यापेक्षा अधिक सुंदर पृथ्वी मागे ठेवली आहे. अधिक सुंदर जळगाव, अधिक हरित खानदेश मागे टाकून ते गेले. अशा असामान्य व्यक्तीला कृतज्ञतेने वंदन करून यापुढे भाऊंच्या परिवारातल्या आपल्या सर्वांनी एकत्र येऊन त्यांचा वारसा जबाबदारीने पुढे नेण्याची प्रेरणा इथे मिळते. आगोलाई ह्या राजस्थानातल्या लहानशा गावातून आपल्या खानदेशात आलेले हे समृद्धीचे बीज केवढ्या मोठ्या विस्तारशील वृक्षरुपाने आपल्यासमोर उभे राहिले, हा डॉ. श्रीनिवास साठे यांनी शोधलेला इतिहास एक दुर्मीळ संशोधन झाले आहे.वाकोद गावी कृषीसंस्कृतीचे बालपणापासून घडलेले संस्कार आणि घरातील मातृकेंद्री करुणा त्यांना आयुष्यभर स्रोत म्हणून प्रेरणादायी ठरले. त्यांच्या आईवरच्या आणि पत्नीवरच्या लेखनात उमटलेले हे अनुबंध मराठी साहित्यात मोलाचे ठरले हे 'ती आणि मी'च्या विक्रमी खपावरून लक्षात येते.

## डॉ. भालचंद्र नेमाडे

ह्या ग्रंथात भाऊंनी आपल्या बुद्धिचातुर्यावर आणि धाडशी प्रयोगशीलतेवर शून्यातून उभारलेल्या प्रचंड उद्योगविश्वाची ह्या पुस्तकातून पहिल्यांदा एकत्र माहिती कळाली आणि मी चकीत झालो. सात हजारांवरून सात हजार कोटीपर्यंत उत्कर्षबिंदू नेणे, ह्याहीपेक्षा किती सामाजिक बांधिलकी त्यांनी निस्वार्थी वृत्तीने पाळली हे महत्त्वाचे ठरते. पपेन, ठिबक, पाईप, टिम्ब्रोन, ट्रेडिंग, फळप्रक्रिया, अन्नप्रक्रिया, ऊतीसंवर्धन, पाणी अडवणे, पर्यावरण, वनशेती, हरितीकरण, सौरऊर्जा, हरितगृहे, सेंद्रिय खते – ही यादी आणखी वाढेल, परंतु शिक्षणसंस्था, नेत्रालय, ग्रामविकास, गांधी संशोधन केंद्र, ह्याशिवाय साहित्यनिर्मिती, भाषणे, प्रबोधन, देशविदेशातल्या होतकरूंना प्रशिक्षण सन्मान आणि पुरस्कार देऊन खालच्या वर्गातल्या कष्टकरी वर्गाला गौरवणे, साहित्यिकांना पुरस्कार – अबबब. केवळ जीनियस एवढी कामे एकट्याने करू शकतात. ह्या सगळ्या कार्यशीलतेमागे कुठेतरी मोहंनजोदडो काळापासून आपल्या

मराठीतील प्रतिभावंत साहित्यिक ज्ञानपीठकार डॉ. भालचंद्र नेमाडे, डॉ. गो. मा. पवार आणि मधु मंगेश कर्णिक यांच्या समवेत भवरलाल जैन



संस्कृतीची पायाभरणी करणारे जैनमताचे विकसनत्त्व प्रभावी आहे. एका इंग्रजी मासिकात भाऊंच्या जैन इरिगेशनबद्दल लिहिले होते, – ए कम्प्लीट ॲग्री सोल्यूशन प्रोव्हायडर – शेतीला उन्नत करण्यासाठी लागणारे सर्व काही देणारा उद्योग. देशभर कुठेही कानाकोपऱ्यात सिमल्याकडे आसामात अरुणाचलकडे अचानक जैन इरिगेशनची फळी दिसते आणि आपला ऊर भरून येतो. हे आमच्या गावचे – खानदेशचे म्हणताना छाती भरून येते.

चहाच्या वेळी त्यांची नातवंड आसपास बागडत होती आणि त्या म्हणाल्या, ''मुले काय आपले मुद्दल असते, नातवंडे हे त्यांच्यावरचे व्याज, ती खरी आपली आवडीची मिळकत असते.'' हे मला फारच आवडून गेलं. मुद्दल खरोखरच कुठेतरी अडकवून ठेवल्यानं आपल्या जवळ नसते. असे नेहमी होत गेले. पुढे आमच्यात बऱ्याच गोष्टी समाईक असल्याचं कळलं – साने गुरुजी, श्यामची आई, महात्मा गांधी, जैन मतातला अनेकान्तवाद तर त्यांच्या सगळ्याच कृतींमध्ये



२०११ मध्ये पद्मश्री पुरस्कार जाहीर झाल्यानंतर भवरलाल जैन यांनी जळगाव येथील आपल्या निवासस्थानी डॉ. भालचंद्र नेमाडे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. प्रतिभा नेमाडे यांचा सत्कार केला. त्यावेळी शेजारी सौ. निशा जैन, सौ. शोभना जैन, अशोक जैन, अथांग आणि अभंग जैन

भाऊंच्या प्रत्येक भेटीत त्यांच्याकडून काही तरी नवीन विचार, नवी दृष्टी मिळाल्याचे ते गेले त्या वेळी सिमल्यापासूनच्या रात्रभरच्या प्रवासात मला एकामागून एक आठवत गेले. आमची पहिली भेट, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने मला डी.लिट. पदवी प्रदान केली तेव्हा. मित्रवर्य महानोरांबरोबर मला भेटून घरी नेले आणि गप्पा गोष्टी झाल्यावर निरोप घेताना ते मनापासून म्हणाले, 'नेमाडेसाहेब येत जा हो असे दिल्या-घेतल्याशिवाय काहीही कसे वाढेल?' हा वाक्प्रचार मला एकदम नवा वाटला. हा बहुधा मारवाडी भाषेतला असावा. तो मला एकदम पटला. नंतर एकदा त्यांच्याकडे गेलो तेव्हा असाच भारी वाक्प्रचार कांताईकडून मला ऐकायला मिळाला.

आचरणात दिसून यायचा. होमिओपॅथी, ॲलोपॅथी, योगविद्या, नॅचरोपथी, फिजिओथेरपी – सगळ्यांमध्ये काहीतरी तथ्य असते, काही निरुपयोगी पण असू शकते. स्यादास्तिच नास्ति चावक्तव्यः। गेल्या भेटीत गोव्याहून घरी जाताना माझ्या संरक्षणासाठी ३ पोलिस पाहून ते म्हणाले 'घरी या, थोडं बोलायचं आहे.' खरं तर मला असं कायम पोलिसांसह त्यांच्याकडे येणं प्रशस्त वाटत नव्हतं. परंतु मागे एकदोनदा सांगवीला जाताना मुंबईहून थेट गावी गेल्याचे त्यांना कळले, तेव्हा त्यांनी मला भेटून माझ्याकडून वचन घेतलं होते की केव्हाही गावी जाताना मी जळगावला थांबून भेटल्याशिवाय पुढे जाऊ नये. एरवी सहवास कसा भेटेल? हे वचन आजपर्यंत पाळत

आलो आहे. तर ही पोलिस संरक्षणाची हकीकत ऐकून ते म्हणाले, 'नेमाडेसाहेब, इथे दोनच शक्यता आहेतः एक तर तुम्ही त्यांना संपवा - हे जमेल का? नाही. किंवा ते तुम्हाला संपवतील. हे शक्य आहे की नाही? होय. मग अशा जीवावरच्या खेळात कशाला भाग घेता? ते सगळं मुलाखती, भाषणं, आपली मते जाहीर मांडणं बंद करा. त्यापेक्षा लिहा. हेच तुम्हाला लिहून जास्त चांगलं सांगता येईल आणि इथे सगळं तुमचं सामान घेऊन राहायला या. केव्हा ट्रक

आज मला तीनशे कोटी रुपयांचा तोटा झाला. ही त्यांची जगण्याची सहजता ग्रेट होती.

भाऊंनी एवढ्या प्रचंड उलाढालींमध्ये कायम शेतीला अग्रक्रम दिला. कोणत्याही उद्योगात शेतकऱ्याला केंद्रभागी ठेवले. तत्त्व आणि व्यवहार सतत जोडले. काय आहे आणि काय असावे, काय नाही आणि काय नसावे - याचे प्रतिभ ज्ञानाने- इन्ट्यिूशनने आकलन केले. भावना आणि तर्क यांचा मनोहर संगम घडवून आणला.





**भवरलाल जैन यांनी लिहिलेल्या ती आणि मी या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. विजया राजाध्यक्ष आणि डॉ.भालचंद्र नेमाडे**

पाठवू? कादंबऱ्या फक्त लिहा, केव्हा येता? हे मला पटले आणि मी सर्व जाहीर कार्यक्रम, टी.व्ही. पूर्ण बंद केला. सामान घेऊन त्यांच्याकडे कादंबरी लिहायला जाऊन राहाणं मात्र मला जमलं नाही. ती रुखरुख आहेच. ता. क. पण आता २०१९ मध्ये म्हणजे ऑक्टोबर पासून मी जैन हिल्सवरच राहून हिंदू कादंबरीचा दुसरा भाग लिहित आहे आणि भवरलालजींची इच्छा पूर्ण करीत आहे.

आल्बेर कामूने गौरवलेले अस्तित्त्ववादी मूल्य-मृत्यूचे भान - हे भाऊंच्या अंगीच होते. मीही ते अनुभवले आहे. पण भाऊ ज्या स्वाभाविकपणे म्हणायचे की माझं चार वेळा हृदयाचं ऑपरेशन झालं आहे. एक वेळ हृदय अर्धा तास बंद पडलं होतं तेव्हा एकदा म्हणाले,


परंपरेचा आदर सतत ठेवला, आपलीच प्राचीन देशी मूल्ये नव्या रूपात मांडली. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर हिंदुस्थानात सतत होत आलेले एककल्ली लॅटरल थिंकिंग त्यांच्या वागण्यात, विचारात, कुटुंबात, समाजात- कुठेच आढळत नाही. कुल आणि शील ही ऋषभदेवांपासून मानलेली दोन महान मूल्ये प्रत्यक्ष पाळून चांगला कॅपिटॅलिझम प्रत्यक्षात आणला. लाखांचा पोशिंदा होणाऱ्या अशा कॅपिटॅलिझमला आज तरी जगात कुठे दुसरा पर्याय नाही.

हा जसा अशोकभाऊ, अनिल, अजित आणि अतुल यांचा वारसा आहे, तसाच आपल्या सर्वांचा आहे.



आयुष्यभर शेती आणि शेतकरी यांच्याच उन्नतीचा ध्यास घेऊन भवरलाल भाऊ शेती व तत्सम पूरक व्यवसायातच कार्यरत राहिले. शेतातील पिकांशी आणि शेतकऱ्यांशी होणारा त्यांचा रोजचा संवाद ज्वलंत, जिवंत आणि नवे काही उत्साहाने घडविणारा होता. शेतकऱ्यांना नाविन्यतेची स्वप्ने दाखवित त्यांच्या पंखात जगभर उडण्याचे जे बळ भाऊंनी भरले त्यासंबंधी ६०-६५ वर्षांपासून भाऊंशी संबंध राहिलेल्या न्हावी गावच्या विष्णू विठू बोरोले या ९२ वर्षांच्या शेतकऱ्याने व्यक्त केलेल्या भावना व सांगितलेल्या आठवणी.





# मालाला भाऊंच्या प्रेमाचे कोटींग

– विष्णू विठू बोरोले

मु. न्हावी, ता. यावल

भवरलालजींचा आणि माझा प्रथम परिचय १९६७-६८ मध्ये झाला. त्यावेळी भाऊंनी जळगावच्या बाजारपेठेत 'जैन ब्रदर्स ॲग्रो एजन्सी' या नावाने खते, औषधे, बी-बियाणे यांचे दुकान उघडले होते. श्री. एस. व्ही. पाटील हे भाऊंचे सहकारी होते. ते आमचे चांगले परिचीत होते. त्यांनी एके दिवशी मला सांगितले की, आमच्या दुकानातुन तुम्ही खते, बियाणे घेत जा. आम्ही चांगल्या कंपन्यांची दर्जेदार बियाणे विक्रीला ठेवतो. त्यामुळे त्याकाळी भाऊंच्या दुकानात जाऊन मी ज्वारीचे ९ नंबरचे आणि गव्हाचे (आता नंबर आठवत नाही. माझे वय ९२ झाले आहे) बियाणे आणले. चार एकर गहू आणि दोन एकर ज्वारी पेरली होती. बियाणे इतकं बेस्ट होते की ४ एकरात ५० पोती गहू आणि एकरी १० पोती ज्वारी झाली. शेजारच्या बोरखेड गावातून बैले आणून खळ्यात धान्याची मळणी केली. पीक इतकं जोमदार होते की शेजारच्या गावातली माणसे ते पीक बघायला यायची. भवरलाल भाऊंनी त्याच वेळेला ट्रॅक्टरची ही एजन्सी घेतली होती. या ट्रॅक्टरच्या मदतीने त्यांनी नवीन बियाण्यांचा फार चांगला प्रचार केला. त्यावेळी ते गावोगावी जायचे. शेतकऱ्यांना भेटायचे. त्यांना नवीन वाण, लागवडीचे तंत्र, टाकावयाची खते यासंबंधीची माहिती सांगायचे. पुढे पुढे भाऊ शेती विषयीचे अनेक निरनिराळे कार्यक्रम करू लागले. त्याला आम्ही जात असू. त्यामुळे आमचा संबंध व संपर्क वाढत गेला. भाऊ दिवसभर दुकानावर बसलेले असायचे आणि येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येकाशी आदराने, प्रेमाने बोलायचे. आवर्जून घरची परिस्थिती कशी आहे याची विचारणा करायचे. त्यामुळे आमच्या पण मनात भाऊंबद्दल आपुलकी वाढत गेली. बाकीच्या दुकानदारांसारखे ते नुसता माल विकत नव्हते. त्या मालाला प्रेम आणि जिव्हाळ्याचे कोटींग लावित होते. त्यामुळे पिक हमखास दर्जेदार येणार यावर आमचा विश्वास होता.

भाऊंनी त्या काळात राजदूत गाड्यांचीही एजन्सी घेतली होती. माणूस वागायला फार चांगला म्हणून त्यावेळी आम्ही त्यांच्याकडून एकदम तीन राजदूत फटफटी घेतल्या. एक गाडी लिलाधर दामू भारंबे यांच्यासाठी, एक माझ्यासाठी आणि एक आम्ही तापी उपसा सिंचन सहकारी सोसायटी काढली होती तिच्यासाठी. मी सोसायटीचा सचिव होतो आणि श्री. जे. टी. महाजन यांना सोसायटीचे अध्यक्ष केले होते. या उपसा योजनेला अगोदर नाबार्ड परवानगी देत नव्हते. बऱ्याच खटपटीनंतर परवानगी मिळाली. ८ कि.मी. अंतरावर असणाऱ्या बामणोदच्या कॅनॉलवरून पाईपने पाणी आणून न्हावी गावची सर्व केळी भिजवीत होतो. उपसा योजनेची मुख्य पाईपलाईन सिमेंटची होती. परंतु, प्रत्येक शेतावर पाणी नेण्यासाठी पीव्हीसी पाईप वापरले होते. हे पाईप आम्ही भवरलालजींकडूनच घेतले होते. जवळपास पाईपाचे आठ ट्रक आणले होते. पाईपलाईन चांगली टिकली. अजूनही काही लोकांकडे ते पाईप आहेत.

१९८७-८८ च्या सुमारास भाऊंनी ठिबक सिंचनाचे तंत्रज्ञान आणले. त्याचे साहित्य बनवायला सुरूवात केली. आम्हाला मोठे नवल व कुतूहल वाटले. सुरूवातीला आमचा तंत्रावर विश्वासच नव्हता. आम्ही पाटाने एवढे प्रचंड पाणी देतोय तरी १५-२०

शेतकऱ्यांना ट्रॅक्टर्स वितरीत करण्याच्या समारंभात कंपनीचे अधिकारी, भवरलाल जैन आणि शेतकरी





रोपवाटिकेत उतीसंवर्धन पद्धतीने तयार केलेली केळीची रोपे

किलोच्या पुढे घड जात नाही. ठिबकने तर पाच किलोचा तरी घड लागेल का नाही अशी शंका होती. गावात लोक जमले की या ठिबकने पाणी देण्याच्या गोष्टीची चर्चा व्हायची. ''काही लोक हसायचे. भवरीभाऊंच्या कशाला नादी लागताय. तो काहीपण आणतोय आणि आपल्याला विकतोय. थेंबाथेंबावर कुठं केळी येतात का?'' असे बरेच लोक त्यावेळी म्हणायचे. त्यामुळे आमच्याही मनात शंकेची पाल चुकायची. पण मी, आत्माराम घना भंगाळे आणि पितांबर नथ्थू बेंडाळे या तिघांनी धाडस करून न्हावी गावात प्रथम ठिबक बसविले. एस.व्ही. पाटील साहेब आणि भाऊ ठिबकचा प्रचार करीतच होते. पूर्वी वाफा भरून पाणी द्यायचो तेव्हा १५-१६ किलोचा घड पडायचा. पण ठिबक संचावर लावलेल्या केळीचा पहिल्याच वर्षी २५ ते ३० किलोचा घड पडला. आम्हाला ठिबकवर केळी येतील की नाही याची खात्री नसल्यामुळे काही केळी पाटाच्या पाण्यानेच भिजवत होतो आणि काही थोडे क्षेत्रच ठिबकखाली नेले होते. पण ठिबकवरची केळी एकदमच उत्कृष्ट आली. डोळ्यांना दोन्ही पद्धतीतला फरक दिसला. आमचे डोळे खाडकन् उघडले आणि एवढं पाणी केळी पिकाला भरण्याची गरज नाही याची मनोमन खात्री पटली. मग सगळी केळी ठिबकवरच नेली. १५ ते २० हजार रोपे म्हणजे १२ ते १३ एकर केळी त्यावेळेपासून दरवर्षी मी लावतो आहे. पूर्वी ५ बाय ५ किंवा ५ बाय ४.५ मिटर या अंतरावर रोपे लावायचो त्याकाळी १७४२ रोपे बसायची. आता जैन टिश्यूकल्चरची एकरी १२५० रोपे लावतो.

भवरलाल भाऊंमुळे शेतीत निरनिराळे प्रयोग करण्याची आम्हाला सवयच लागून गेली. भाऊंनी केळीची टिश्यूकल्चर पद्धतीने रोपे बनविली. पहिल्यांदा मी पाच हजार रोपे घेतली. रोपे खूपच चांगली होती. टिश्यूचा घड २५ किलोच्या पुढे पडे. ग्रॅन्डनैन ही व्हरायटी खूपच फायदेशीर आहे हे आमच्या लक्षांत आले. मग आम्ही तिघांनी पण ही टिश्यूची रोपे घेतली. त्यावेळी भाऊंनी धनू भोळे यांना ट्रायलसाठी पहिल्यांदा टिश्यूची रोपे दिली होती. ते आमच्याच गावात होते. एस.व्ही. पाटीलही आमच्याच भागातले. शिवाय नातेवाईकही होते. त्यामुळे भाऊंवर आमचा विश्वास होता. त्यांच्या सांगण्यामुळेच आम्ही हे नवीन तंत्रज्ञान स्वीकारले होते. मध्यंतरी जैन कंपनीची आर्थिक स्थिती थोडी अवघड झाली होती. त्यावेळेला दोन-तीनदा मी भाऊंना जाऊन भेटलो. पण ते खंबीरपणाने वागले. त्यांनी धीर सोडलेला नव्हता. भाऊंनी कधीच कुणाचे नुकसान केले नाही. उलट त्यांच्यामुळे लोकांचा फायदाच झाला. हळूहळू वयोमानाप्रमाणे आम्ही मागे पडत गेलो. नवीन पिढी पुढे आली. या पिढीचे नशिब फार चांगले. त्याना प्रगत तंत्रज्ञान व संपूर्ण पॅकेज जैन कंपनीने उपलब्ध करून दिले. मालाला भावही चांगला मिळत गेला. त्यामुळे टिश्युकलचर रोपांची लागवड वाढत गेली. रूंद लागवड जवळपास बंद झाली. भाऊंनी केळीची टिश्यूकल्चर येथे आणि ठिबकचे तंत्रज्ञान आणल्यामुळे आमच्या जळगाव जिल्ह्याचा पूर्ण चेहरामोहरा बदलला आहे. आज लाखो-कोटी रूपये शेतकऱ्यांना केळीच्या पिकातून मिळताहेत ही भवरलाल भाऊंचीच कृपा व देणगी आहे.

# भवरजी, तुम्ही निर्मिले पाणी।।

मूर्त जाहली इथे विराणी
आज ही स्वप्नातली कहाणी
भगीरथाचा पुत्र होउनि
तुम्ही निर्मिले पाणी।।१।।

उजाड डोंगर, खडकमाळ हा
जेव्हा पाहिला तुम्ही
हुरहुरले काळीज कराया
नंदनवन या स्थानी
स्वहस्ते वेचूनि दगड ते
अर्ध्य दिले घामानी
तुम्ही आणिले पाणी।।२।।

वृक्षांच्या रोमांचे हिरव्या
सजले डोंगर इथले
आम्र, सीताफळ, पेरूंनी
हा आसमंत डोले
ठायी ठायी वन दाट जाहले
मोर नाचती हर्षे
आनंदाने पक्षी गाती,
सुस्वर जीवनगाणी
कारण तुम्ही राखले पाणी।।३।।

तळ्या तळ्यांच्या बिलोरी आयनी
रूप पाही घनराई
अगा नवल हे कसे घडले?
चकित होती पशु गाई
मेघ थबकुनि जाती बरसुनि
मानवंदना देवोनि
तुम्ही अडविले पाणी।।४।।

बळीराजाच्या उद्धारास्तव
पाझर तुमच्या मनी
इथे सर्व साम्राज्य उभविले
कृषिस्तव ध्येयासाठी
रात्रंदिन तो ध्यास जीवाला
त्यातून ही अमर कहाणी
तुम्ही निर्मिले पाणी।।५।।

सोन्याचे हे हात तुमचे
सोने केले दगड मातीचेही
पुरूषार्थाची गाथा आणि
कथा उज्ज्वल ध्येयाची
दृष्टी जोखते भविष्याला
वर्तमान तेजस्वी घडविला
या मातीच्या कणाकणावर
पत्थर आणि या काळावर
कर्तृत्वाची तुम्ही कोरली,
अमीट, मनोहर लेणी
तुम्ही जमवूनि पाणी।।६।।

नकोच आता ताज आम्हाला
नको नवी मंदिरे
हवीत अशी राष्ट्रासाठी
आधुनिक तीर्थक्षेत्रे
जैन हिल, व्हॅली, गुरूकुले
तुम्ही उभविली जनहिते
पाणी पाणी करणाऱ्यांना
दिलेत पाऊस पाणी
भवरजी, तुम्ही निर्मिले पाणी।।७।।

– सौ. सुरेखा शहा
सोलापुर






**जीवन लक्ष्य**

सत्य, अहिंसा, शांततापूर्ण सहजीवन, श्रमपतिष्ठा, आस्था व प्रेम यावर आधारित नवविश्व निर्मितीसाठी झटणे.

**भविष्य-वेध**

गांधीजींचे जीवन, विचार आणि कार्य यांचा अथांग ठेवा भविष्यातील पिढयांसाठी जतन करणे.

**पार्श्वभूमी**

सत्य आणि अहिंसा ही चिरंतन टिकणारी मूल्ये आहेत. गांधीजींनी जन्मभर यांचेच आचरण व आध्यापन केले. आजच्या जगाची दुरवस्था पाहता योग्यरित्या विचार करणाऱ्या प्रत्येक माणसाला मूल्याधिष्ठित, तर्कनिष्ठ गांधीवादी तत्त्वांच्या पायावर उभी राहणारी संभाव्य वैकल्पिक जीवनशैलीचा विचार करण्यास भाग पाडते. जगाला हे भान नक्कीच आले आहे. कारण यूनोने २ ऑक्टोबर हा गांधीजींचा जन्मदिवस आता **आंतरराष्ट्रीय शांतता व अहिंसा दिन** म्हणून घोषित केला आहे.

भगवान महावीर, गौतम बुद्ध आणि येशू ख्रिस्त यासारख्या महान पुण्यवान साधू-संतांनी देखील प्रेम आणि अहिंसा यांचीच शिकवण दिली आहे. या सर्व साधू-संत-महात्म्यांच्या शिकवणुकीचा रोख माणसाच्या आत्म्यातच बदल करण्यावर होता. या मूळ गांधीतत्त्वांच्या शिकवणींचं एकत्रीकरण करणं आणि त्यासाठी त्यांना संस्थात्मक आखणी देणं हे समाजात बदल घडवून आणण्यासाठी गरजेचं आहे. जगभर न्यायासाठी होणाऱ्या संघर्षात उपयोगी पडावं म्हणूनही त्यांनी **अहिंसा** हे एक परिणामकारक शस्त्र म्हणूनच विकसित केलं. जसा मार्ग, तसाच त्याचा शेवट असं ते म्हणत.

आपण आज अनंत समस्यांनी भरलेल्या जगात आहोत. लोकांना त्यातून मार्ग हवाय. सुटका हवीय. यासाठी गांधीजींनी सुचवलेल्या उपायांकडे गांभीर्यपूर्ण मनानं आणि औत्सुक्यपूर्णतेनं पहाण्यासाठी लोकांचं लक्ष वेधणं महत्त्वाचं झालं आहे. कारण मानवापुढं उभ्या असलेल्या समस्यांमधून नैतिक तत्त्वांवर आधारित उपाय शोधण्याचा त्यांचा प्रयत्न होता. सद्य:स्थितीच्या संदर्भात गांधीजींचं आयुष्य आणि तत्वं लागू ठरतात. जगभरातीलच लोक गांधीजींचं आयुष्य, तत्त्वज्ञान आणि कार्य यांचा अभ्यास करीत आहेत. गांधीजींनी दाखवलेल्या दिशेनं प्रयोग करू पाहणाऱ्यांची संख्याही वाढतेच आहे. तो एक कालातीत स्फूर्तिदाता आहे. गांधीजींचं आयुष्य आणि तत्त्वं यांचा प्रसार व्हावा व पुढच्या पिढयांसाठी ती जपून ठेवावीत यासाठी एक आंतरराष्ट्रीय दर्जाचं संसोधन केंद्र, स्मारकासमान गांधी संग्रहालय, ग्रंथसंग्रहालय, अत्याधुनिक पुराण वस्तू संग्रहालय एवढा आवाका असलेली संस्था निर्माण करणं आवश्यक होतं. या सर्वांचा परिपक्व विचार करूनच गांधीतीर्थची संकल्पना केली आणि ते उभारले गेले.

२५ मार्च २०१२ या दिवशी भारताच्या तत्कालिन राष्ट्रपती प्रतिभा देवीसिंग पाटील यांच्याहस्ते **गांधीतीर्थ** मानवतेला अर्पण करण्यात आले आहे.



गांधी रिसर्च फाऊंडेशन

गांधी तीर्थ, जैन हिल्स, जळगाव-४२५००१ (महाराष्ट्र) भारत; दूरध्वनी: +९१ २५७-२२६००३३, २२६४८०१, ९४०४९५५३००, ९४०४९५५२२०

इ-मेल: info@gandhifoundation.net; वेबसाइट: www.gandhifoundation.net




## तीन मूलभूत तत्त्व

अनुभूति स्कूल पुढील तीन मूलभूत तत्त्वांशी वैचारिक निष्ठा राखून आपले ध्येय सिद्ध करील:
पहिलं तत्त्व – भारतीय संस्कृतीशी प्रबुद्ध आणि सुदृढ अशी बांधिलकी, दुसरं तत्त्व – सहकार्य आणि मिलनसार वृत्तीची जोपासना,
आणि तिसरं तत्त्व – सामाजिक आणि पर्यावरणीक बांधिलकीला जपणारी उद्यमशीलता.

## कार्यप्रणाली

या ध्येयसिद्धीसाठी एक शैक्षणिक संस्था म्हणून अनुभूति, शिक्षणक्रम, अभ्यासक्रम, निरनिराळी प्रात्यक्षिकं, प्रयोग, योजना, प्रकल्प यांचे अभ्यासपूर्ण निरीक्षण करेल. शिक्षक, संयोजक, संबधित सर्व, हे तत्त्वज्ञान समजून घेऊन, अंगीकारून, ते आपल्या आचार, विचार व बोलण्यात उतरविण्याचा मनापासून प्रयत्न करतील. वर नमूद केलेल्या तीन प्रमुख तत्त्वांची जोपासना करून, विद्यार्थ्यांनाही त्यांचे महत्त्व पटवून देऊन त्यांच्या आधारे जगण्यास प्रवृत्त करतील.

अनुभूतिच्या वास्तुच्या आतील व बाहेरील सर्व घटक एकत्रितपणे या परिसरातील, प्रांगणातील संपूर्ण वातावरण आध्यात्मिक बनविण्यात योगदान देतील. ज्यायोगे विद्यार्थी व शिक्षकांमधे जागृती येऊन, त्यांची हृदये खुली होऊन, अहिंसा, अपरिग्रह, अनेकांत सिद्धांत, कर्मयोग, सहिष्णुता, कुटुंबवत्सलता, परस्पर सहयोग आणि पर्यावरण–जागरुकता या मूलभूत कृतिशील मूल्यांचा स्वीकार करतील. याहीपुढे जाऊन हे सर्व, अनुभूतिच्या विद्यार्थी व शिक्षकांना त्यांच्या वैयक्तिक व संपूर्ण समाजाच्या सार्वत्रिक लाभासाठी या मूल्यांचा अंगीकार व आचरण करण्यास प्रेरित करतील.

येथे मांडलेली तत्त्वज्ञाने व विचारप्रणाली कर्मठ कर्मकांडे नाहीत. आवश्यकतेनुसार कधीही, कुठेही, त्यात परिवर्तन करता येऊ शकेल; मात्र ते त्यावर खूप गहिरं चिंतन, उहापोह व विचारविनिमय केल्यानंतरच.

## जीवनध्येय


विद्यार्थी व शिक्षकांस सृजनशील, कर्तृत्ववान, संवेदनशील, जागतिक दृष्टिकोन असलेले, संतुलित, संयमशील चारित्र्यसंपन्न नागरिक बनण्यासाठी परिपोषक व अनुकूल असे शैक्षणिक वातावरण निर्माण करणे हे अनुभूतिचे जीवनध्येय आहे.

अनुभूति स्कूल

**अनुभवाधारित निवासी आंतरराष्ट्रीय विद्यानिकेतन**

जैन डिव्हाईन पार्क, पो. बॉक्स ११५, जळगाव–४२५००१ (महाराष्ट्र) भारत; दूरध्वनी: +९१ २५७–२२६४६००

इ–मेल: info@anubhutischool.in; वेबसाइट: www.anubhutischool.in





**जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.**

कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

जैन प्लास्टिक पार्क, रा.म.क्र. ६, पो.बॉ. ७२, जळगांव–४२५००१. (महाराष्ट्र.)
**दूरध्वनी:** ०२५७–२२५८०११; **ई–मेल:** krushitirth@jains.com; **संकेतस्थळ:** www.jains.com

**मुद्रक, प्रकाशक मनिष अमृतलाल शहा** यांनी जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. जळगाव यांच्यावतीने आनंद पब्लिकेशन, १०६/१/अे, एन. एच. क्र.६,मुसळी फाटा, ता. धरणगाव, जि. जळगाव (महाराष्ट्र) येथून छापून जैन प्लास्टिक पार्क, पोस्ट बॉक्स नं.७२, बांभोरी, जळगाव–४२५००१ येथून अंक प्रकाशित केला आहे. **संपादक: डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे; वर्ष: २; अंक: १** (डिसेंबर २०१९/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही)

Post Regn. No.: JAL/417/2019-2021
Published on 19th of every month, posted on 20th of every month at Jalgaon-425001
**RNI NO. MAHMAR/2018/76944**